# नवनीत

मे २०२४



# मुखपृष्ठाविषयी
# सतरंगी आनंदाची सुरेल किणकिण



कमला निंबकर बालभवनचा २०२४ चा वार्षिक प्रकल्प ‘सलोखा’ या विषयावर होता. इ. सहावीच्या वर्गात धार्मिक सलोख्याचा विचार करताना कासारकाम हा व्यवसाय प्रकर्षाने समोर आला. इस्लाम धर्म मानणारी ही कासार मंडळी सर्व जाती–धर्मांच्या स्त्रियांच्या हातात बांगड्या भरतात. याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी सहावीच्या विद्यार्थ्यांनी फलटणमधील कासारपेठेला भेट दिली. सावकार बँगल्सचे मालक ज़ैद अमीरभाई मणेर यांच्याशी गप्पा मारल्या. त्यांचे कुटुंब गेली १२० वर्षे अविरतपणे महिला व मुलींच्या आयुष्यात आनंदाचे आणि सौंदर्याचे रंग भरण्याचे काम अतिशय सन्मानाने करत आहेत.

ज़ैद चाचांकडून मुलांनी बांगड्यांचा इतिहास, निर्मिती, प्रवास या गोष्टी तर जाणून घेतल्याच पण बांगड्या नाजूकपणे कशा भरल्या जातात तेही पाहिले. हेच दृश्य कोलाजच्या माध्यमातून मांडण्याचे मुलांनी ठरवले आणि चाचांकडून फुटलेल्या बांगड्यांचे तुकडे मागून घेतले.

महिलांच्या कष्टमय जीवनात सतरंगी आनंदाची सुरेल किणकिण भरणाऱ्या या कासार मंडळींना पाहताना जाणवते की हीच तर आपल्या सांस्कृतिक सलोख्याची अनोखी ठेव आहे!



कोलाज संकल्पना व निर्मिती: नंदिनी धुमाळ, श्रीजा बोबडे, समर्थ सन्नके, शांभवी निंबाळकर, समर्थ ओझर्डे, देवेंद्र धवडे, प्रणाली जाधव, प्रणय काकडे, नमिता डांबे इ. ६ वी, समृद्धी पवार, इ. ५ वी

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

# नवनीत

## कमला निंबकर बालभवन व आपली शाळा

वार्षिक पत्रिका

प्रगत शिक्षण संस्था, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २०२४

**संपादकीय मंडळ**
**(इ. नववी)**
झील कर्णे
रेवा जोग
मोक्षल दोशी
संस्कृती कदम
यश साठे
मयुरेश कुंभार
मानसी पवार
सई सस्ते
समृद्धी मोहिते
आशिष राऊत
समिधा घोरपडे

**संपादकीय सहाय्य**
विद्यादेवी काकडे
मधुरा राजवंशी
कल्पिता दंडवते
वैशाली आडके

**मुखपृष्ठ मांडणी**
रमाकांत धनोकर

**मलपृष्ठ**
अवंती निंबाळकर,
इ. आठवी

**अंकमांडणी**
रमाकांत धनोकर
dhanokar@gmail.com

**रेखाचित्रे**
सोनल गायकवाड,
इ. ८ वी

**रेखाटन मार्गदर्शक**
हर्षदा शिंदे

**संगणकीय अक्षरजुळणी**
पूनम वाघमारे

अनेक कथा व कवितांची चित्रे त्या त्या लेखक व कवींनी स्वतः काढलेली आहेत.

**मुद्रण :** ग्रीन ग्राफिक्स, सी–१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे ४११०११

**प्रकाशन :** प्रगत शिक्षण संस्था, लक्ष्मीनगर, फलटण ४१५५२३
pragatshikshansanstha@gmail.com | www.pssphaltan.org

# अनुक्रम


१ एक आहे पोपट / ८
२ खार बाई खार / ८
३ आकाशातले तारे / ८
४ बाग / ९
५ एक थी चींटी / ९
६ हवा / ९
७ मिरची / ९
८ बिचारे गाढव / १०
९ सुट्टीतल्या गमती / १०
१० मेरा फिश टँक / ११
११ मुंबई के दर्शन / १२
१२ क्रिसमस / १२
१३ उन्हाळ्याची सुट्टी / १३
१४ आमोशाची गोष्ट / १३
१५ ईद का दिन / १४
१६ सायबर क्राईमचा विळखा / १५
१७ मन म्हणजे / १६
१८ कासव / १६
१९ चिंगी / १७
२० माझा दिनक्रम आगळावेगळा / १७
२१ पप्पांच्या कामातली एसटी / १८
२२ पार्टी / १८
२३ सुट्टीचा दिवस / १९
२४ कविताच सुचेना / २०
२५ रात्र पावसाची / २०
२६ नेटवर्क / २१
२७ रॉबिन / २२
२८ मैं बडी होकर क्या बनूँगी? / २२
२९ निसर्गाच्या गोष्टी / २३
३० झाड / २३
३१ झाड / २३
३२ शाळेतल्या गोष्टी – माझ्या आवडत्या ताई / २४
३३ शाळा / २४
३४ कस्तुरी ताई / २५
३५ अभ्यास / २५
३६ शाळा / २५
३७ आमची शाळा / २६
३८ शाळा / २६
३९ परीक्षा / २६
४० म्हणींची गंमत / २७
४१ नई पाठशाला / २७
४२ दोस्तीच्या कविता / मित्र / २८
४३ मैत्रीण/ २८
४४ दोस्ती / २८
४५ चौकट / २९
४६ देवदेव / ३०
४७ बालपण / ३०
४८ ग्रंथमहोत्सवाचा अनुभव / ३१
४९ कावळा / ३३
५० दु:खाची जाणीव / ३३
५१ गणित / ३४
५२ गणिताची गोची / ३४
५३ पिलट्याची धूम / ३५
५४ Math: My Greatest Teacher of All Time! / ३७
५५ Rainy Poems / ३८–३९
५६ The Library Incident / ४०
५७ Journey of Memories / ४१
५८ Time Travel / ४२
५९ May be Next Year? / ४२
६० El-coco / ४३
६१ Dreams / ४४

# संपादकीय

गेली २० वर्षे नवनीत वार्षिक पत्रिका मुलांचे उत्तमोत्तम लेखन वाचकांसमोर मांडत आहे. याही वर्षीच्या नवनीतची पाने मुलांच्या आयुष्यातील त्यांच्या स्मरणात राहिलेले प्रसंग, आठवणी, गमती–जमती आणि त्यांचे वेगळे विचार व कल्पना यांनी सजलेली आहेत.

या वर्षी शाळेबद्दल इतक्या साऱ्या मुलांनी लिहिले आहे की 'शाळेतल्या गोष्टी' असा एक विभागच आम्ही केला आहे. परीक्षा, अभ्यास, आवडत्या ताई, गणित अशा अनेकविध विषयांवर मुलांनी लेखन केले आहे. कस्तुरी ताईंवर राजवीरने लिहिलेली कविता फारच विनोदी. दहावीनंतर शाळा सोडताना मनात येणाऱ्या भावना रुचिता आणि साक्षी यांच्या इंग्रजी लेखांत वाचायला मिळतात.

काही विद्यार्थ्यांनी अत्यंत हृदयस्पर्शी लेखन केले आहे. यात राजेश्वरीच्या 'दु:खाची जाणीव' या कवितेचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. जखमी गाढव पाहून झालेली अर्णवची तळमळ किंवा कावळा गेल्यानंतर श्रीराजच्या मनात उठलेले भाव त्यांच्या लेखनातून सहज जाणवतात.

सुट्टीतील गमतीजमती अनेक मुलांनी लिहिल्या आहेत. अभिनवने त्याच्या नेहमीच्या खुमासदार शैलीत केलेले ग्रामीण लेखन म्हणजे 'पिलट्याची धूम.' निसर्गाबद्दलही भरपूर लेखन आले आहे. आठवीच्या पावसाबद्दलच्या इंग्रजी कविता विशेष सुंदर.

'चौकट' हा सोनलचा लेख वाचताना मुलेही किती प्रगल्भ विचार करू शकतात हे जाणवते. नववीत आल्यावर अचानक मुलांभोवतीचे वातावरण आणि त्यांच्याकडून असणाऱ्या मोठ्यांच्या अपेक्षा यांमध्ये होणारे बदल झीलने तिच्या इंग्रजी लेखातून नेमके मांडले आहेत.

आपल्या आयुष्यात शिरकाव केलेल्या 'एआय'ने साहजिकच मुलांच्या लेखनातही जागा मिळवली आहे. 'सायबर क्राईमचा विळखा' या कथेतून आजच्या युगात अतिशय महत्त्वाच्या बनलेल्या या विषयाबद्दल अगदी छोट्या मुलांमध्येही किती समज आणि जागरूकता आहे हे दिसून येते.

यावेळच्या सर्व लेखनापैकी निम्म्या कविता आहेत! प्राणी, शाळा, मन, मैत्री असे अनेक विषय मुलांनी हाताळले आहेत. श्रेयसची 'आकाशातील तारे' आणि राहा व साईराज या दोघांच्या 'झाड' या कविता विशेष वाचनीय.

या वर्षी आम्ही संपादनाचे काम प्रथमच केले. हा अतिशय वेगळा आणि संस्मरणीय अनुभव होता. संपादकाची आणि लेखकाची मते, विचार, दृष्टिकोन हे नेहमी जुळतीलच असे नाही. असे असतानाही लेखकांचे लेखन अधिक चांगले होण्यासाठी आपण कशी मदत करू शकतो हे आम्ही शिकलो. आपल्या सर्वांना या वर्षीचे नवनीत आवडेल अशी आम्ही आशा करतो.

**झील, रेवा, मोक्षल, संस्कृती, इ. नववी**



आपण पतंग उडवतो आणि पतंगाचा मांजा चिमणीच्या पायात गुथवडा करतो आणि चिमणी मरून जाते. तेव्हा मला खूप वाईट वाटतं.

**माही काकडे, मधला गट, आपली शाळा**

मी चिकन बिर्याणी केली. चिकन, तांदूळ, मसाला आणला. चिकन मसाला टाकून शिजवलं. एका पातेल्यात भात टाकला, चिकन टाकलं, परत भात टाकला, परत चिकन टाकलं. झाकण लावलं. मग बिर्याणी तयार झाली.

**अक्षरा अहिवळे, मधला गट, आपली शाळा**







मटकी पाण्यात भिजत घातली. मग ती ढोली झाली. नंतर विद्या ताईंनी संध्याकाळी रुमालात बांधली. मटकीला कोंब आले. मग ताईंनी मटकीत कांदा, कोथिंबीर टाकून शिजवली. आम्ही फरसाण टाकून मिसळ पावाबरोबर खाल्ली.

**प्रज्ञा काकडे, मोठा गट, आपली शाळा**



आम्ही दगड गोळा केले. मग किचनजवळची लाल माती उकरली. त्यात पाणी ओतून चिखल केला आणि सगळ्यांनी मिळून दगडांवर तो चिखल लावला. काट्या गोळा करून रंगवल्या. पायऱ्यांवर लावल्या. त्यांना पांढरा रंग दिला आणि मोहरी टाकली. आमचा किल्ला तयार झाला.

**त्रिशा रोकडे, मोठा गट, आपली शाळा**



मी शिशुगटातल्या भूमीचा हात पकडला होता. मच्छी मार्केटमधला गणपती बघितल्यावर त्या दादानं आम्हाला भेळ खायला दिली. पुढं गेल्यावर बारामती चौकात एक गणपती होता. तो गणपती बघितल्यावर आम्ही परत शाळेत आलो.

**श्रेया जाधव, मोठा गट, आपली शाळा**



परिसर भेटीला गेल्यावर फणसाचं झाड पाहिलं. फणसाचा आकार उभा होता. त्या फणसाला काटेपण होते. जास्वंदाच्या फुलाचं झाड बघितलं. नारळाचं झाड मोठं होत. त्या झाडाला थोडे नारळ आले होते.

**पराग यादव, शिशुगट, कनिंबा**



पातेलं घ्यायचं, त्यात थोडं पाणी घ्यायचं, २ चमचे साखर, चहा पावडर थोडी टाकायची. थोडं उकळून घ्यायचं. १ कप गच्च भरून दूध टाकायचं. चहा झाला की सोफ्यावर बसून चहा आणि चपाती खायची.

**काव्या भोसले, शिशुगट, कनिंबा**

मी दिवाळीत मम्मीला गुलाबजाम बनवायला मदत केली. आधी खवा घेतला, तो मळला. नंतर त्याचे गोल–गोल छोटे गोळे बनवले. मग तेलात तळले. नंतर साखरेच्या पाकात घातले. गुलाबजाम तयार झाले.

**रुजुला सातपुते, शिशुगट, कनिंबा**



## एक आहे पोपट



एक आहे पोपट
तो आहे हिरवागार
पण त्याची चोच लाल लाल
त्याला आवडतो पेरू
बोलणे त्याचे चुरुचुरु
चिमुकले चिमुकले पाय
आणि चिमुकले चिमुकले डोळे
पोपटा, मला तू खूप आवडतो
पण तुला मी आवडते का?

**आराध्या रोमन**
इ. चौथी

## खार बाई खार

खार बाई खार
घाई तुला फार
पटकन करते झाडाला पार
इवल्या इवल्या हातात
इवलासा खाऊ धरते
इवल्याशा खाऊने
पोट कसे भरते?
झुबकेदार शेपूट हलवत येते
मला बाई त्याची फार मजा वाटे
बसल्यावर दिसते डौलदार अशी
राहता उभी ऐटदार दिसे

**स्वरूप भुजबळ**
इ. चौथी

## आकाशातले तारे

आई ग आई,
रात्रीचा तर एवढा
अंधार असतो की
झाडंही दिसत नाहीत

हो रे हो

पण आई
मग चंद्र कसा दिसतो?

अरे, चंद्रही काळाच असतो
पण चांदण्यांचा प्रकाश त्यावर पडतो

असं होय!

**श्रेयस घोलप**
इ. चौथी

## बाग

चला बागेत जाऊया
सुंदर सुंदर फुले पाहूया
फुलांवर बसलेली सुंदर सुंदर फुलपाखरे
फुलपाखरांचे सोनेरी रंग
फुलपाखरांसंगे खेळतो
आम्ही छोटाली मुले

**लावण्या माने**
इ. चौथी

## एक थी चींटी

एक थी चींटी
थी वह बडी सीधी
खाती थी शक्कर मीठी
शक्कर खाकर हो जाती वह मोटी
उसको थी एक चोटी
चोटी में थी बहुत मिट्टी
दूर दूर से वह पानी लाती
अपनी चोटी को पानी से धोती
चल-चल कर वह पतली हो जाती
फिर से खाती शक्कर मीठी
शक्कर खाकर हो जाती मोटी!

**शांभवी निंबाळकर, सेजल अहिवळे**
कक्षा छठी



## हवा

येतेस कधी जोराने
तर कधी हळुवार
पावसाळ्यात घेऊन येतेस पावसाचे थेंब
थंडीत करतेस सर्वांना गार

कधी तू पाडतेस आजारी
सगळे म्हणतात, बदलली हवा
जेव्हा येतेस उन्हाळ्यात
बरे वाटते जिवा

तुझ्यामुळेच डुलतात
शेतात पिके हिरवी
जेव्हा जाते वीज तेव्हा
सर्वांना तू हवी हवी

**समय व्होरा**
इ. सहावी

## मिरची

मिरची ग मिरची
तू कशी वाकडी तिकडी
खूपच आहेस लुकडी

जेव्हा असतेस लालभडक
जिभेला होते जळजळ
पण असतेस जेव्हा हिरवीगार
वाटते खाऊन टाकावी पटकन

**शर्वरी काटकर**
इ. पाचवी

# बिचारे गाढव

एके दिवशी दुपारी मी शाळेतून घरी आलो होतो. अभ्यासाला बसलो, तेवढ्यात आजोबांनी हाक मारली. पाहतो तर रस्त्यावर एका गाढवाचा अपघात झाला होता. मी आजोबांना विचारले की हे कसे झाले तर त्यांनी सांगितले की एका ट्रकने गाढवाला धडक दिली. ते गाढव जबर जखमी झाले होते. त्याच्या डाव्या पायाला लागले होते. काही लोकांनी त्याला उचलून झाडाखाली ठेवले आणि शेजारच्या फळवाल्या काकूंकडून पाणी आणून त्याला पाजले. मला खूप वाईट वाटत होते.

आठवडाभर ते बिचारे गाढव तिथेच अर्धमेले होऊन पडले होते. काही माणसे त्याला शिळी चपाती, भाकरी खायला घालायची. आठवड्याभराने एका दादाने डॉक्टरांना बोलवून त्याला सलाईन लावली. त्या गाढवाला थोडे बरे वाटले. दुसऱ्या दिवशी त्याच दादाने रुग्णवाहिका बोलवून गाढवाला दवाखान्यात नेले. ते गाढव बरे झाले की नाही हे मला माहीत नाही.

**अर्णव लाळगे**
इ. चौथी



# सुट्टीतल्या गमती

मी आणि माझे मित्र आम्ही पोहायला जायचं प्लॅनिंग करत होतो. जायच्या आधी आम्ही दहा–दहा रुपये काढून मॅगी पार्टी केली. पार्टी झाल्यावर टॉवेल घेऊन मी म्हणालो, चला की लवकर पोहायला! मग आम्ही सगळे बारवंच्या विहिरीवर पोहायला गेलो.

संग्राम म्हणाला, टाका सुळका! मग आम्ही सगळ्यांनी हात धरून टाकली की उडी! तेवढ्यात संभवचा पाय विरूळ्यानी धरला. तो भिऊन बाहेर पडला. अंग पुसायला लागला. मी पण गेलो वर आणि त्याला परत पाण्यात ढकलून दिलं. मग मी मस्त सुळकी मारली.

घरी परत गेल्यावर माझ्या मनात एक विचार आला. मी म्हणलं चला आबाधुबी खेळू. मग आम्ही कापसाचा बॉल घेऊन एकमेकांना बडवायला लागलो. खेळून खेळून कंटाळा आला. साईच्या डोक्यात एक युक्ती आली. तो म्हणाला पेप्सीच्या बॉलने खेळू. एखाद्याला बॉल लागला तर रडतच घरी! झालं काय की शेजारच्या आजी झोपलेल्या. माझ्याकडून बॉल गेला पत्र्यावर आणि जोरात आवाज झाला. आम्ही पटकन लपलो. बॉल काय मिळाला नाही. आजीनं दिल्या शिव्या आणि आमचा खेळ झाला बंद!

**समर्थ सन्नके**
इ. सहावी

# मेरा फिश टँक

मुझे मछली बहुत पसंद है। खाने के लिए नहीं, पालने के लिए। उसमें बहुत काँटे होते हैं तो खाने में तकलीफ होती है।

एक दिन मैं और पापा मार्केट गए थे। वहाँ काँच के बोल में कुछ मछलियाँ बिकने ले लिए आई थी। मैंने कीमत पूछी तो अंकलने सौ रुपए जोडी बताई। हम बाजार घूमकर घर आए तो मैंने माँ को बताया की बाजार में मछली बिकने के लिए आई थी। माँ बोली, ''वो तो रोज ही आती है।'' ''अरे, खाने की नहीं, पालने की!'' मैंने बताया तो फिर माँ को समझ आया।

फिर मैं पापा के पास गया और उनसे पूछा कि हम भी मछली पालें क्या तो उन्होंने नहीं बोल दिया। मैंने पूछा क्यों, तो बोले, ''उनको क्या क्या लगता है? खाने का पेडिग्री क्या होता है तुझे पता है क्या? मछली को पालना बहुत कठिन होता है।'' मैंने कहा, ''मेरे एक दोस्त को सब पता है। मैं कल उससे पूछ लेता हूँ।'' तो पापा ने कहा, ''देख ले, तेरी मर्जी...''



अगले दिन स्कूल से घर आने के बाद मैं मेरे दोस्त ओम के पास गया। उसने मुझे मछली पालने के बारे में पूरी जानकारी देदी। उस दिन पढाई करने के बाद मैंने यूट्यूब पर मछलियों की अलग अलग जातियाँ देखी। मैंने पापा को सब बताया फिर भी वे सुनने के लिए तैयार नहीं थे। उनको लग रहा था कि यह सब बहुत महँगा पडेगा। लेकिन मेरे दिमाग से मछली पालने की बात गई नहीं।

गर्मियों की छुट्टियों में मैंने पासवाली दुकान से काँच खरीदी और साइज बताकर उनसे कटवा ली। फिर बाजार से फेविक्विक लाया और काँच को चिपकाकर फिश टँक बनाया। पासवाली दुकान में फिर ले जाकर टँक का लीकेज निकलवाया। मेरी यह सब मेहनत देखकर फिर पापा भी मान गए।

मैंने यूट्यूब पर देखा था कि कोलकाता में मछलियों की एक जोडी सिर्फ पंद्रह रुपए की मिलती है और डिलिवरी एकदम मुफ्त! तो फिर मैंने कोलकाता से छह मछलियाँ मँगाई। मेरी मछलियाँ रेल्वे से आई। मैं और पापा उन्हें लेने के लिए बारामती रेल्वे स्टेशन गए थे।

घर वापिस आकर मैंने उन मछलियों को फिश टँक में छोडा। टँक में ऑक्सिजन मशीन लगाई और मछलियों को खाना भी दिया। मेरे बनाए हुए टँक में वे रंगबिरंगी मछलियाँ बहुत ही सुंदर दिख रही थी।

**यश सावंत**

कक्षा सातवी

# मुंबई के दर्शन

मैं पहली बार मुंबई जानेवाला था। मैं बहुत उत्साहित था। घरवाले सब जल्दी खाना खाकर सो गए, लेकिन मुझे ग्यारह बजे तक नींद ही नहीं आई।

अगले दिन मेरी नींद सुबह चार बजे खुल गई। मुझे बहुत आश्चर्य हुआ क्योंकि रोज तो मैं सात बजे उठता हूँ तो आज चार बजे ही कैसे उठ गया! यह जरूर मुंबई जाने के उत्साह का परिणाम था।

नहा धोकर मैं मोबाईल देखने लगा तो डाँट पडी। फिर मैं किताब खोलने ही वाला था कि गाडी का हॉर्न बजा और मैं भागकर आँगन में चला गया। आसपास बहुत ही अंधेरा था।

हमारा सफर शुरू हो गया। हम मुंबई जा रहे थे क्योंकि मेरे मामा की बेटी का नामकरण था। गाडी पूरे अंधरे में चल रही थी। पहले हम पुणे गए और वहाँ से मेरी दादी के भाई को साथ लिया। पुणे में ही हमें ग्यारह बज गए थे। तो हम जल्द से जल्द मुंबई के लिए रवाना हो गए।

मुंबई की ऊँची इमारतें देखकर मैं दंग रह गया। मैंने वहाँ पहली बार पिझ्झा खाया। हमारे गाडी के ऊपर से एक हवाई जहाज गया। वह बहुत ही शोर कर रहा था। हमने ताज हॉटेल देखा, लोगों की भीड देखी। लेकिन सबसे ज्यादा देखा वो ट्रॅफिक! कभी कोई ॲमेझॉन के जंगल में फस गया तो बाहर निकल आए, मगर इस ट्रॅफिक से बाहर निकलने में कितना समय लगेगा पता नहीं! उस दिन हम रात दो बजे घर पहुँचे। यह दिन मुझे जिंदगी भर याद रहेगा।

**आनंद कुलकर्णी**
कक्षा सातवी

# क्रिसमस

लहानपणी क्रिसमस आल्यावर खूप छान वाटायचे. आदल्या दिवशी मला जी कोणती वस्तू पाहिजे असायची ती मी एका चिठ्ठीत लिहून एका मोज्यामध्ये टाकून रात्री दरवाजाला बांधायचे. मला ते करायला खूपच आवडत असे. सकाळी उठून पाहिले की मला ती वस्तू मोज्यामध्ये मिळायची. मला असे वाटायचे की खरेच सांता स्वतः येऊन मला पाहिजे ती वस्तू देऊन जातो. दरवर्षी मी असेच करायचे.

पण मी जशी मोठी झाले, मला समजायला लागले की सांता वगैरे काही नसतो. या सगळ्या अफवा आहेत. पण मग मला असे वाटले की मोज्यामध्ये चिठ्ठीत लिहिलेली वस्तू मला कशी काय मिळायची? मी जरा विचारातच पडले. नंतर मला मम्मीने सांगितले की माझी काकी आणि भाऊ मिळून मी झोपल्यावर चिठ्ठी बघायचे आणि सकाळी ती वस्तू आणून मोज्यामध्ये ठेवायचे.

हे ऐकून मला खूप छान वाटले. माझी काकी आणि माझा मोठा भाऊ सांता बनून मला न कळता ती वस्तू मोज्यामध्ये टाकायचे हा विचार करून मला खूप आनंद वाटतो.

**प्राजक्ता काकडे**
इ. सातवी



## उन्हाळ्याची सुट्टी

उन्हाळ्याच्या सुट्टीत मी मामाच्या गावाला गेलो होतो. मामाच्या घराची वास्तुशांती होती आणि मामाच्या पोरीचे बारसेही होते. मला आणि माझ्या मित्रांना जेवण वाढायला सांगितले. मुली घरात मेकअप करत बसलेल्या. आम्ही वास्तुशांतीला चार वेळा जेवलो!

रात्रीचे विठ्ठलाचे कीर्तन होते. आम्ही सर्वजण कीर्तन पाहत होतो. मामाचा छोटा मुलगा कीर्तनात टाळ वाजवण्यासाठी पुढे गेला. पखवाजाच्या भजनी ठेक्यावर त्याने छान ताल धरला. मला कीर्तन खूप आवडले.

दुसऱ्या दिवशी मामाने आम्हाला हॉटेलमध्ये जेवायला नेले, कारण मुलांनी मदत केली होती. मुलींना नेले नाही कारण मुलींनी काहीच काम केले नव्हते.

मग मामाने आम्हाला विहिरीत पोहायला नेले. माझ्या बहिणीला पोहायला येत नव्हते म्हणून तिच्या कमरेला ट्यूब बांधली होती. आम्ही पाण्यात पकडापकडी खेळलो. रेसपण लावली. अंघोळ झाल्यावर आम्ही रानात गेलो. तिथे डाळिंबीच्या बागेत गवत काढले. येताना गाडी मी चालवली. उन्हाळ्याची सुट्टी खूप छान गेली.

**रुद्र गोसावी**

इ. सातवी

## आमोशाची गोष्ट

एक दिवशी मी पव्हायला चालल्यालो तवा माझ्याबर एक मुलगा व्हता. त्याचं नाव आमोल. आम्ही त्याला आमोशा असं चिडवायचो. त्यो पाचवीत व्हता. आणि त्याचा भाव नववीत. ती दोघं आंदाराला खूप भेयचे.

पव्हून येताना एका चिचंच्या झाडाव पोरं तुटून पडली. त्याच चिचंच्या खाली एक बाई पुरल्याली. मी ही गोष्ट सगळ्यांना सांगितली. आमोशा म्हनला, ''खरं हाय का हे?'' मी म्हनलो, ''तुला बगायचं? चल उद्या आमोशा हाय. तुला दाखवतोच.''

दुसऱ्या दिवशी पोरं म्हनली की आज पव्हायला नको, आज आमोशाय. आमोशीला पव्हायला जायचं नसतं. अपशकुन आसतंय. कायतरी वेगळं घडतं. मग मी घरीच थांबलो.

रात्री आमोलला चिचंपाशी न्हेलं. त्यो लय भेलेला. त्याला म्हनलं, ''हाडळीला भेत्रंच लागतं आन तू भेत्रंच हाय.'' तो भीतीनं पार रडायलाच आला. मंग मी त्याला म्हनलो, ''आरं, भूत, हाडळ, अपशकुन, आमोशा असल्या गोष्टीवर विश्वास ठेवायचा नाय!'' मंग आमी घरी गेलो.

**सोहम निंबाळकर**

इ. सहावी

# ईद का दिन

आज ईद थी। ईद का त्योहार मुझे अच्छा लगता है। सुबह सब लोग जल्दी उठे। सबने न्हाया और ईदगाह पर नमाज पढने के लिए चले गए। मैंने और अब्बाने भी नमाज पढ ली। नमाज हो गई तो फिर अब्बाने उनके दोस्तों को ईद मुबारक कहा और बोला, शाम को शीरखुर्मा पीने आना मत भूलना। फिर मैंने भी पडोस के मेहमानों को बुलाया।

नमाज के बाद हम सब हॉटेल गए। मैंने सफेद रंग का कुर्ता पहना था। मेरे हाथ पर सब्जी गिर गई और मेरा कुर्ता खराब हो गया। तो फिर मैंने दूसरा शर्ट पहन लिया। फिर हम भी दूसरों के घर पर शीरखुर्मा पीने गए और गुलगुले भी खाए। मेरा मन ही नहीं भर रहा था। मुझे बार बार शीरखुर्मा पीनासा लग रहा था।

शाम हो गई और धीरे धीरे सब लोग घर पर शीरखुर्मा पीने आने लगे। मैंने भी शीरखुर्मा पिया। अम्मी का शीरखुर्मा एकदम लाजवाब बना था। मुझे बहुत अच्छा लगा। फिर मैंने अम्मी और अब्बा के साथ खूब सारे फोटो निकाले, और दीदी के साथ भी।

मेरा बडा भाई मुंबई मे रहता है। उसका नाम साकिब है। वो आज आ रहा था तो मैं बहुत खुश था। वो मेरा सबसे प्यारा भाई है। वो मेरा साथ देता है। उसे आने में देर हो गई। वो आने के बाद मैंने उसे कहा, ''तेरे वास्ते मैं रुका हूँ। चल शीरखुर्मा पीते है।'' फिर अम्मी ने उसे बताया की आधा शीरखुर्मा तो अली ने ही पी रखा है। लेकिन मैंने साकिब दादा के साथ फिर से शीरखुर्मा पिया और गुलगुले खाए।

रात के खाने में अम्मीने बिर्याणी बनाई हुई थी। मुझे बहुत अच्छी लगी। उसके साथ साथ मीठे में गाजर का हलवा भी बनाया था। हलवा भी स्वादिष्ट था। मैं खाने में इतना डूबा हुआ था कि मुझे टीव्ही की आवाज भी नहीं आ रही थी। ऐसा था मेरा ईद का दिन!

**मोहम्मद अली तांबोळी**
कक्षा पाँचवी



# सायबर क्राईमचा विळखा

नेहमीप्रमाणे गार्गीची सकाळ आजही प्रसन्न होती. त्या प्रसन्न वातावरणात ती आवरून ऑफिसला गेली. ऑफिसला गेल्यावर तिथे सर्वांच्या गप्पा रंगल्या व सर्व हसू लागले.

तेवढ्यात गार्गीला फोनचा आवाज आला. तिला एका अनोळखी नंबरवरून मेसेज आला होता–जो की एक फोटो होता व तोही तिचाच! तो तिने कालच काढला होता. तिचा थरकाप उडाला. तिला कळेना आता काय करावे. ती विचारात बुडाली. कारण तो फोटो तिने कुठेही शेअर केला नव्हता.

तेवढ्यात क्षमाने विचारले, ''काय झाले? अशी का घाबरली आहेस?'' गार्गी दचकली. तिने घडलेला सर्व प्रकार क्षमाला सांगितला. क्षमाने तिचा फोन चेक केला. चेक करता करताच क्षमाने गार्गीला विचारले, ''तू कोणते अनोळखी ॲप डाऊनलोड केलेले का? किंवा तू कोणती वेगळी वेबसाईट ओपन केलेली का? किंवा कुठल्या सार्वजनिक चार्जिंग पॉइंटवर फोन चार्ज केला होता का?'' गार्गी म्हणाली, ''हो, मी परवाच रेल्वे स्टेशनवर मोबाईल चार्ज केला होता!'' अचानक गार्गीच्या फोनवर पुन्हा तिचेच फोटो पडू लागले, त्याच अनोळखी नंबरवरून. गार्गीच्या मनात पुन्हा धाकधूक सुरू झाली.

क्षमाला कळून चुकले होते की हा एक 'सायबर क्राईम' आहे. तिने हे गार्गीला सांगितले. गार्गीला काही कळाले नाही. ती क्षमाला विचारू लागली, ''म्हणजे काय ग? त्यात काय काय होतं? सांग ना!''

''अग थांब तू! सायबर क्राईम म्हणजे आपला फोन हॅक होतो. फोन हॅक झाल्यावर ज्याने आपला फोन हॅक केला आहे त्याला आपल्या मोबाईलमधील सर्व माहिती कळते व तो आपला फोन चालवतो.'' क्षमा म्हणाली.

''आता काय होणार? माझे सगळे फोटो त्याला दिसतील?'' गार्गी अजूनच घाबरली.

''तू काळजी करू नकोस, माझी एक मैत्रीण आहे ती नक्की तुला मदत करेल, ती सायबर क्राईम डिपार्टमेंट मध्ये आहे. ती असले क्राईम बघते. ती खूप अनुभवी आहे. हे कोणी केले ते ती शोधून काढेल. तिचे नाव मैथिली गावस्कर आहे. मी तिला फोन करते.'' क्षमाने मैथिलीला फोन करून सर्व माहिती दिली.

मैथिलीने सर्व शहानिशा केली तेव्हा तिला कळले की गार्गीचा फोन हॅक केला ती व्यक्ती अमरावतीमधील होती.

घडले असे की जेव्हा गार्गीने सार्वजनिक ठिकाणी फोन चार्जिंगला लावला तेव्हा तिथे त्या व्यक्तीने चार्जिंग पॉईंटमध्ये चिप बसवली व सर्व माहिती ए आय च्या मदतीने मिळवली. त्यानंतर तो गार्गीचा फोन चालवू लागला.



हा सर्व प्रकार जेव्हा गार्गीला समजला तेव्हा तिला तिने केलेल्या चुकीचा बोध झाला. आता ती काळजी बाळगू लागली. अनोळखी चार्जिंग पॉइंटवर मोबाईल चार्जिंगला लावणे तिने बंद केले. ती अनोळखी लिंकही ओपन करत नव्हती. तिने सायबर क्राईमवर एक कोर्स केला व कोर्स पूर्ण झाल्यावर तिने एक लेख लिहिला. त्यामार्फत या सर्व प्रकाराची माहिती तिने सर्वांपर्यंत पोहोचवली व लोकांना सावध केले.

**गाथा भुजबळ, शर्वरी दळवी, स्वरा कुमठेकर**

इ. सहावी

---

## मन म्हणजे

मन म्हणजे भावनांचे शिवार
मन म्हणजे विचारश्रृंखलेचा पिटारा
मन म्हणजे अकबराचे प्रश्न
मन म्हणजे बिरबलाचे उत्तर
मन म्हणजे संस्कार
मन म्हणजे विकार
मन म्हणजे स्वप्नांची दुनिया
मन म्हणजे ध्येयाची बुनिया
मन म्हणजे प्रेमाचे भंडार
मन म्हणजे क्रोधाचा अंगार
पण मन म्हणजे नक्की काय?
मन म्हणजे केवळ एकच
स्वतंत्र व्यक्तिनिष्ठ अनुभवांची साठवण

**प्रज्ञा शहा**

इ. सातवी

## कासव

मी इयत्ता दुसरीमध्ये शिकत होते. आम्ही विद्यानगरमध्ये राहायला होतो. तिथे एक विहीर होती. अनेक वर्षांपूर्वी बांधलेली, दगडाची. तिला वरून जाळी लावलेली. जाळीचा रंग तांबूस होता. विहिरीच्या कडेने हिरवेगार गवत उगवलेले. सकाळी सकाळी गवताशेजारी विहीर पाहायला खूप छान वाटायचे.

एकदा मी त्यात डोकावून पाहिले तर काय, त्यात एक छानसे कासव होते. ते दिसायला खूपच सुंदर होते. त्याचे डोळे पाणीदार होते. मान वळणदार. त्याचे तोंड एकदम छोटेसे होते. रंग शेवाळी आणि फिकट लिंबाच्या रंगासारखा. कवचावर षटकोनी आकार होते. त्याचे पाय आपल्या तळहातासारखे होते, आणि नखे इतकी छोटी– पेन्सिलच्या टोकाएवढी.

मी दादाला बोलवले. दादानेसुद्धा कासव पाहिले. त्याने मला एक युक्ती सांगितली. आपण त्या कासवाला चपातीचे तुकडे खायला देऊयात. अरे वा! छानच युक्ती! दादाने चपातीचे तुकडे आणले आणि आम्ही त्या कासवाला खायला दिले. एक तुकडा टाकला की तो तुकडा बुडायच्या आधी ते कासव तुकडा खाऊन टाकायचे.

ही आमची रोजचीच गंमत सुरू झाली. दोन–तीन आठवडे रोज मी विहिरीवर जात असे. आई–बाबांनी दुसरे घर पाहिले होते. दुसऱ्या घरी जाताना मला खूप रडू आले. त्या कासवाशी झालेली मैत्री आणि चपातीच्या तुकड्यांची गंमत अजूनही आठवते.

**नंदिनी धुमाळ**

इ. सहावी



# चिंगी

मला रविवारची खूप ओढ असते, कारण मी या दिवशी आमच्या शेळी फार्मवर जातो. तिकडे आम्ही एका पिल्लाचे नाव चिंगी ठेवले आहे. चिंगीसोबत मी खूप खेळतो. तिला दूध पाजतो.

मागच्या रविवारी चिंगी आजारी पडली. मी पटकन पप्पांना सांगितले आणि पप्पांनी मला औषध आणायला मेडिकलमध्ये पाठवले. मी औषध आणले. पप्पा जेवत होते. मी पप्पांना जेवणावरून उठवले आणि म्हणालो, ''चला आधी चिंगीला औषध देऊ.'' पप्पांनी औषध सिरिंजमध्ये भरले आणि चिंगीला इंजेक्शन दिले. इंजेक्शन दिल्यावर चिंगी रडायला लागली. माझ्यापण डोळ्यात पाणी आले. पण मी ते सावरून चिंगीपाशी गेलो आणि काय! ती उठली आणि माझ्यासोबत खेळायला लागली. मला तर वाटायला लागले की ती रडायचे नाटक करीत होती की काय. चिंगी माझ्यावर खूप प्रेम करते. मी पुढच्या रविवारची वाट पाहत आहे चिंगी...

**शिवेंद्र खलाटे**

इ. सहावी



# माझा दिनक्रम आगळावेगळा

माझा दिवस चालू होतो तो आईच्या हाकांनी– ''उठ श्री, उठ!'' मग रमतगमत उठायचे आणि मित्रांसोबत सायकलिंगला जायचे. गिरवी नाक्यावरून गोल राउंड मारून पक्ष्यांचा किलबिलाट ऐकत सकाळच्या कोवळ्या उन्हात घरी परतायचे. सर्व काही उरकून शाळेला निघायचे. गाड्यांचा कलकलाट ऐकत शाळेत जायचे. जशी शाळा जवळ येईल तसा झाडांचा आवाज कानावर पडायला लागतो.

शाळेत आल्या आल्या झाडांची थंड सावली पाहून खूप बरे वाटते. वाऱ्यामुळे झाडांची पाने पाण्याच्या थेंबासारखी पडतात. ती पाने पकडायला भरपूर मजा येते. शाळेत आलेल्या मित्रांना, शिक्षकांना भेटल्यावर असे वाटते की शाळा हे दुसरे घरच आहे माझे.

शाळेत तासाच्या मध्येच लाईट गेली तर खूप गरम होते. पण खिडकीतून आलेली वाऱ्याची झुळूक हवीहवीशी वाटते. ती हवा जशी अंगाला झटते तशी लगेच गायब होते. असे वाटते की ती आपल्या सोबतच राहावी. जादा तासाला वाचन कट्ट्यावर मात्र ही झुळूक अंगावर खेळत राहते.

संध्याकाळी मित्रांशी गप्पागोष्टी करत घरी आल्यावर लगेच बॅडमिंटनला जायचे. आम्ही विमानतळाच्या तिथूनच जातो. सूर्य मावळताना असे वाटते की विमानतळाच्या शेवट लांब टोकाला सूर्य उभा आहे. खेळून झाल्यावर पुन्हा गाड्यांचा कलकलाट ऐकत घरी जायचे. जरा वेळ अभ्यास करून, जेवण करून मग गाढ झोपी जायचे.

**देवेंद्र धवडे**

इ. सहावी

# पप्पांच्या कामातली एसटी

आम्हाला दिवाळीची सुट्टी होती. तेव्हा मी माझ्या मामाच्या गावी गेले होते. पप्पांना बरडला एसटीची ड्युटी होती. मी आणि राजवीरने पप्पांकडे हट्ट केला. मग पप्पा हो म्हणाले. मी राजवीर, मम्मी आणि मामाची मुलगी म्हणजे ओवी, अशा आम्ही चौघांनी एसटीत बसून पप्पांचे काम बघितले. म्हणजे पप्पा तिकिटे कसे काढतात ते. काही प्रवाशांनी बरडची तिकिटे काढली तर काहींनी मठाच्या वाडीची.

खिडकीतून वाऱ्याची झुळूक आल्याने ओवीचा डोळा लागला. बरड स्टँडला एसटी थांबली. मग आम्ही ओवीला उठवले. पप्पांनी स्वतःसाठी आणि मम्मीसाठी वडापाव घेतला. मला आणि राजवीरला किंडरजॉय आणि ओवीला पॉपिन्स घेतले. मग आम्ही परत एसटीत बसलो.

पप्पा नवीन प्रवाशांची तिकिटे काढू लागले. आम्हाला मठाच्या वाडीला जाताना डोंगर, झाडे आणि जास्त करून बाजरीची पिके दिसली. मठाच्या वाडीचे स्टँड आले. आम्हाला न्यायला मामा आला होता. मामानेही आम्हाला खाऊ घेतला. मला पप्पांबरोबरचा एसटीचा प्रवास खूप आवडला.

**सिद्धिका इंगळे**
इ. चौथी



# पार्टी

दिवाळी संपली होती. आमच्या कुटुंबाने शेतात पार्टी करायचा निर्णय घेतला. आम्ही रविवारी जाणार होतो. मी आधीच ठरवून ठेवलेले की खूप मजा करायची. शेवटी तो दिवस आला. सगळ्यांचे आवरल्यावर आम्ही शेतात जायला निघालो. अर्ध्या तासाने शेतात पोहोचलो. खाली चटई टाकून बसलो. चूल पेटवली.

आम्ही बसलो होतो त्याच्या बाजूलाच मधमाश्यांचा एक थवा पाणी पिण्यासाठी आला होता. माझे काका तिथे लाकडे गोळा करत होते. त्यांना एक माशी चावली. ते थव्याकडे बोट दाखवत म्हणाले ''हे बघा मला माशी चावली.'' पुढच्याच सेकंदाला सगळ्या मधमाश्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. ते कॅनॉलच्या पुढच्या बाजूला पळत सुटले. दुसरे काका खाली उसाच्या फडात पळाले.

आम्ही बाकीचे सगळे आधी ओढणीमध्ये लपलो. आम्हाला वाटले जातील माश्या थोड्या वेळाने. पण नाही! त्या तिथेच गुणगुणत होत्या. मम्मी म्हणाली, ''आता पळा!'' आम्ही कितीही पळालो तरी माश्यांनी आमचा मार्ग काही सोडला नाही. दोन–तीन मिनिटे सगळे ओरडत होते. आम्ही लहान मुले रडत होतो.

अचानक आम्हाला तिथे एक झोपडी दिसली. आम्ही पटकन झोपडीत घुसलो आणि लपलो. थोड्या वेळाने बाहेर आलो. माश्या कुठे दिसत नव्हत्या. फलटणला परत येऊन आम्ही जोशी डॉक्टरांच्या क्लिनिकमध्ये जाऊन इंजेक्शने घेतली. आमची चांगलीच पार्टी झाली त्या दिवशी.

**रिद्धी अडसूळ**
इ. सहावी

# सुट्टीचा दिवस

सुट्टीचा दिवस होता. लवकर उठावेसे वाटत नव्हते. पण गावाला जायचे होते ना, म्हणून मला सगळे आवाज देत होते. हळू-हळू डोळे उघडले. सगळे आवरून मी लगेच गाडीच्या पुढच्या सीटवर जाऊन बसले. कारण माझ्यात आणि माझ्या भावात पुढे कुणी बसायचे याची नेहमीच शर्यत असते. मग थोड्या वेळाने आम्ही सासकलला जायला निघालो. रस्त्यातली हिरवीगार झाडे पाहून मला सासकल जवळ आल्याचे जाणवले. तिथली ती थंडगार हवा, फुलांचा सुगंध हवाहवासा वाटला.

आम्ही पोहोचलो तितक्यात मला घरासमोरची झाडे दिसली. मोगऱ्याला कळ्या आल्या होत्या. ते पाहून माझ्या अंगावर आनंदाच्या लाटा आल्या. मी अंगणातल्या सर्व झाडांना पाणी घातले. झाडे अगदी टवटवीत दिसू लागली. आमच्या बागेतील लाजाळूचे झाड माझे फेवरेट आहे. मी त्याचे निरीक्षण करत होते, तितक्यात माझी एक चुलत बहीण मला बोलवायला आली आणि म्हणाली, ''चल लवकर लगोर खेळायला.'' माझा आनंद गगनात मावेना.

मी पळतच खेळायच्या ठिकाणी आले आणि म्हणाले, मी ''विराज दादाच्या टीममध्ये हां!'' मग टीम पाडायला सुरवात झाली. विराज दादाने मला, स्वराला आणि समर्थला म्हणजेच सगळ्यात छोट्या प्लेअरला मागितले आणि सोनू दादाने जानूला आणि सार्थकला मागितले. झाले! टीम पडल्या. बोलिंग सोनू दादाच्या टीमकडे गेली. मी खुश! विराज दादाने फील्डिंग लावली. आमच्या जागा ठरल्या. मला माहीत होते की सोनू दादाचा नेम परफेक्ट आहे. मी बॉल अडवायला तयार! पण त्याचा नेम काही लागतच नव्हता. त्यानेच त्याच्या टीमला ऑल आउट केले.

आता आमची बोलिंग होती. विराज दादाने बॉल मारला. त्याला जानू म्हणाली, ''काय रे अंगात म्हसोबा संचारल्यासारखा बॉल मारतो!'' आता बोलिंग माझी होती. मी नेम धरून बॉल मारला. नेम बसला. चांगल्या पाच सहा लगोरी पडल्या. मी पळाले आणि सोनू दादाने बॉल जानूकडे फेकला. तिने मला मारला. मी बॉल हुकवला. बॉल लांब गेला. मी, स्वराने आणि दादाने लगोर रचली आणि ''लगोर!'' ओरडलो. सोनू दादाच्या टीमवर एक भेंडी चढली. आता मी परत बोलिंग करणार तितक्यात समर्थ ''मला! मला!'' करत ओरडू लागला. मी त्याला बॉल दिला आणि म्हणाले, ''जा भाई, जी ले अपनी जिंदगी!'' पण या शहाण्या बाळाने टीम ऑल आउट केली.

आता दुसऱ्या टीमकडे बोलिंग होती. जानूचा नेम लागला. विराज दादाने मला बॉल एकदम फास्ट दिला. माझ्याकडून कॅच सुटला! ''साधा कॅच पकडता येत नाही!'' विराज दादा म्हणाला. मी त्याला पळता पळता टोमणा मारला, ''फर्स्ट इयरच्या मुलाने मारलेला बॉल किती हळू असतो ना रे!'' मी बॉल घेऊन लगेच जानूला मारला. झालं! भेंडी चढली.

तितक्यात विराजदादाला कुणीतरी हाक मारली. खेळ थांबला. मी घरी आले. माठातले थंडगार पाणी पिले आणि दमून झोपी गेले. असा होता माझा सुट्टीचा दिवस.

**संस्कृती मुळीक,** इ. सहावी

## कविताच सुचेना

काय करू मी मला कविताच सुचेना
किती विचार केला तरी यमक काही जुळेना

कितीही प्रयत्न केला तरी विषयच आठवेना!
कशी करू कविता मला काहीच कळेना!

सुंदर सुंदर विषय लपले आहेत तरी कुठे?
नेहमी जुळणारे यमक आज जुळत नाहीत कसे ?

शेवटी एकदाचा विषय आठवला
तो एकदाचा सुंदर शब्दांत मांडला

अखेर सुचली मला कविता
आता वाहते आहे माझ्या कल्पनांची सरिता

**संस्कृती मुळीक**
इ. सहावी




## रात्र पावसाची

रात्रीची वेळ. सगळीकडे काळोख पसरला होता. नऊ वाजून गेले होते. आम्ही सगळे जेवण उरकून गप्पा मारत होतो. बाहेर जोराचा पाऊस पडत होता. पावसाचा आवाज कानावर पडत होता. थोड्याच वेळात पाऊस कमी झाला. तेवढ्यात एक मांजराचे पिल्लू धावत येऊन माझ्या अंगावर चढले. ते पावसाने ओलेचिंब झाले होते. मी त्याला जवळ घेतले आणि त्याचे अंग पुसून त्याला कापडात गुंडाळले. ते थंडीने थरथरत होते.

थोड्याच वेळात आमचा सोनेरी रंगाचा कुत्रा मोती त्या पिल्लाचा शोध घेत आत आला आणि पिल्लावर झेप घेऊ लागला. बिचारे पिल्लू आणखीनच घाबरले आणि उडी मारून माळ्यावर जाऊन बसले. मोती त्याच्यावर भुंकत राहिला. त्याला उतरू देईना. तेव्हा आईने मोतीला साखळीने घराबाहेर पत्र्याच्या शेडमध्ये बांधले. मग मांजर हळुवारपणे खाली उतरले. आम्ही त्याला वाटीत दूध पिण्यास दिले. ते दूध पिऊन माझ्या मांडीवर झोपले. नंतर त्याला सोफ्यावर अंथरूण टाकून झोपवले. ते पिल्लू खूपच गोंडस होते.

जाग आल्यावर ते इकडेतिकडे टुकूटुकू पाहू लागले. त्याच्या गळ्यात पट्टा होता. त्यावर त्याच्या मालकाचा पत्ता होता. सकाळी आम्ही त्याला घेऊन मालकाच्या घरी गेलो. मालकांनी आमचे आभार मानले. अजूनही मी अधून मधून त्या माऊला भेटायला जाते.

**श्वेता शहा**, इ. पाचवी



# नेटवर्क

**पुसेसावळीत दंगल झाल्याने सातारा जिल्ह्यातील नेटवर्क तीन दिवस बंद होते.**

**त्याचा परिणाम इयत्ता चौथीच्या मुलांच्या शब्दांत –**

गेले तीन दिवस नेटवर्कमुळे खूप अडचण आली. कारण की पप्पांना ॲम्ब्युलन्सवर कॉल गेले होते व पेशंटकडे कॅश नव्हती. मग पेशंटला अडचण आली. ते म्हणाले की आम्ही तुम्हाला पैसे आणून नंतर देतो. आधी आमच्या पेशंटला वाचवा. मग पप्पांनी त्यांचे ऐकले. त्यांनी वर्दी केली. तीन दिवसांनी पेशंटने पैसे दिले. ते पेशंट पुण्याचे होते. नेटवर्क नसल्यामुळे केवढा गोंधळ झाला.

**नेत्रा काळे**

आपल्याकडे तीन दिवस नेट बंद होतं. म्हणून लोकांना खूप अडचणी आल्या. माझ्या पप्पांना डेअरीच्या कामाच्या अडचणी आल्या. म्हणजे डेअरीमधील एंट्री मारायला येत नव्हत्या आणि बँकेचंही खूप नुकसान झालं. मला अडचण नाही आली कारण की मी जास्त फोन बघत नाही.

**आराध्या वाघ**

आमच्या घरातली भाजी जेव्हा संपली तेव्हा आमच्याजवळ पैसे तर होते पण सगळे पैसे मोबाईलमध्ये होते. आणि नेट बंद असल्यामुळे कसे पे करायचे हा प्रश्न उभा राहिला. हॉटेलला जेवायला जायचे तर तिथेही कसे पे करायचे? मग एक दिवशी आम्ही शेजाऱ्यांकडून भाजी घेतली.

**श्रेयस घोलप**

मला गेम खेळायला मिळाली नाही. माझ्या पप्पांना मोबाईलवर बातम्या बघायला अडचण आली. माझ्या काकाला मोबाईलवर बॅटबॉल बघायला मिळाले नाही. माझ्या मम्मीला भाजी बनवायला अडचण आली.

**सक्षम काकडे**

माझ्या पप्पांना कामाविषयी अडचण आली. मग ते घरीच थांबले. पण नेट आल्यावर एकदम कामाचा लोड पडला. आमच्या घरात सामान नव्हते. पैसे सगळे पप्पांच्या फोनवर होते. सामान घ्यायला खूप अडचण आली.

**विश्वजीत पाटील**



# रॉबिन

माझ्या बोक्याचे नाव आहे रॉबिन. त्याला सोयाबीन आवडते. त्यापेक्षाही जास्त कुरकुरे आवडतात. जेव्हा मी कुरकुऱ्यांच्या पुड्याचा आवाज करते तेव्हा तो पटकन येतो व खायला मागतो. आम्ही त्याचा वाढदिवससुद्धा साजरा करतो.

रॉबिन लहानपणी उंदरासारखा दिसत होता. माझी आजी तर त्याला उंदीरच म्हणायची. रॉबिनचे तोंड खूप नक्षीदार आहे. त्याचा रंग काळा, राखाडी व पांढरा आहे. तो खूप चपळ आहे. त्याला फुलपाखरू पकडायचे असेल तर तो खालच्या चित्रासारखे करतो. म्हणजे आधी स्टॅच्यू होतो व ते फुलपाखरू त्याच्या नाकावर, कानावर किंवा अंगावर कुठेही बसले की मग तो फुलपाखराला पकडतो. रॉबिन खूपच करामती आहे.

एकदा आम्ही समुद्रकिनारी फिरायला गेलो होतो तेव्हा घरी रॉबिनने आजीला खूप त्रास दिला. तो किचन कट्ट्यावर जाऊन पातेल्यातले दूध प्यायचा.

एकदा त्याला दुसऱ्या मांजराने गालाला मारले. असे वाटत होते की त्याला गालफुगी झाली आहे. रॉबिन आम्हाला खूप त्रास देतो पण पप्पा म्हणतात, राहूदे, बिन आईचं पोरगं आहे ते! मला वाटते की तो थोडा थोडा माणसांसारखा वागतो.

**ऋतुजा कुरकुटे**
इ. चौथी




# मैं बडी होकर क्या बनूँगी?



जब मै पाँचवी कक्षा में थी तब तक मुझे समझ नहीं आता था कि मैं बडी होकर क्या बनूँगी। लेकिन अब मुझे पता है कि मैं बडी होकर डॉक्टर बनूँगी, क्योंकि मुझे विज्ञान के बारे मे पढने में ज्यादा रस है। आजकल मैं विज्ञान विषय की बहुत किताबे ग्रंथालय में पढती हूँ।

जब पापा मुझे पढाते हैं तब मुझे बडा मजा आता है। मुझे वे प्रोत्साहन देते हैं और हमेशा एक वाक्य कहते हैं, ''जान्हवी, खूब किताबें पढो।'' हम पढी हुई किताबों पर चर्चा भी करते हैं। जब मैं कुछ बताती हूँ तो वे हमेशा कहते हैं, ''क्या बात है जान्हवी! बहुत सुंदर तरीके से उत्तर दिया है।'' तब मुझे बडी प्रसन्नता होती है। मेरा मन उडने को करता है।

अब मुझे मेरे वाचन पर ध्यान देना है। शब्द भंडार बढाना है। मैं मेरा कॉलेज पूरा करके डॉक्टर बनूँगी। जब लोग डॉक्टर बनते हैं, तब पता चलता है कि उसके लिए क्या क्या करना पडता है। कितनी मेहनत लेनी पडती है। इसलिए मैं सदैव प्रयत्न करूँगी कि मैं बडी होकर अच्छी डॉक्टर बनूँ।

**जान्हवी कुंभार** कक्षा छठी

## निसर्गाच्या गोष्टी

निसर्ग आहे सुंदर फार
त्यात राहतात प्राणी चिकार
जंगल असते हिरवेगार
झाडे असतात डेरेदार
जंगल आहे प्राण्यांचा निवारा
तेथे असतो गार गार वारा
प्राणी करतात खूप विचार
दिसून येतो त्यांचा सहकार
मांसाहारी प्राणी एकमेकांना खातात
म्हणूनच तर ते जगून राहतात
काही माणसे असतात खूप बेकार
करायला येतात प्राण्यांची शिकार
धडामधुडूम येतो ढगांचा बाजा
पक्षी म्हणतात पाऊस राजा
ढगातून पाणी टिप टिप पडे
तेव्हा येतात पावसाळी किडे
नदी वाहते झरझर झरझर
मासे पोहतात सरसर सरसर
निसर्गाची किमया आहे खूप मोठी
म्हणून आम्ही करतो निसर्गाच्या गोष्टी

**अशरफ शेख,** इ. सातवी

## झाड

झाड हिरवेगार
देते सावली गार
झाड देई फुले
झाड देई फळे
मातीमध्ये त्याची पसरली मुळे
रात्री झाडावरती
विसावे चांदणे
वारा आनंदाने त्याच्या पानांतून वाहे
झाडापासून शिकण्यासारखे खूप काही आहे.

**राहा काझी,**
इ. पाचवी

## झाड

माकड गेले चढून
खार बसली फांदीवर लपून
फुलपाखरू गेले उडून
झाडाने घेतले रडून

**साईराज बोडरे,**
इ. तिसरी



## माझ्या आवडत्या ताई



मी कमला निंबकर बालभवन शाळेत शिशुगटापासून आहे. आधी मी मला शाळेत जायचे नाही म्हणून आईपाशी खूप रडायचे. मग थोड्या दिवसांनी मला माझी शाळा खूप आवडायला लागली. माझी एक मैत्रीण झाली. तिचे नाव आयुक्ती. आम्ही दोघी खूप खेळायचो. एकसाथ अभ्यास करायचो, मस्ती करायचो आणि ओरडाही खायचो.

थोड्या वर्षांनी आम्ही सकाळशिफ्टवरून दुपारशिफ्टला गेलो. आम्हाला शिकवायला नवीन शिक्षक आले. सातवीत गेल्यावर आम्हाला हिंदी शिकवायला कल्पिता ताई आल्या. त्या खूप छान शिकवतात. त्या आयुक्ती आणि प्रियांकाला गल्लीवाल्या म्हणतात.

पहिल्या सत्रात आमच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकात एक धडा होता– फूल और काँटे. त्यावेळी त्यांनी आम्हाला काट्यांवर फुले लावून गुलदस्ता बनवायला शिकवला होता. तो सगळ्यांना खूप आवडला होता. ताईंनी आमच्या दोघींचा फोटोपण काढला होता जो नंतर शाळेच्या एका अहवालावर छापला गेला. मी आणि आयुक्ती खूप खुश होतो. ताईंनी आमची अजून एक ॲक्टिविटी घेतली होती ती म्हणजे आपण पुस्तके कुठे कुठे वाचू शकतो त्याचे एक मोठे चित्र. ते तर खूपच मस्त झाले होते.

कल्पिता ताई माझ्या खूप आवडीच्या ताई आहेत कारण त्या पुस्तकाबाहेरच्या त्यांच्या मनाच्या अनेक गोष्टी शिकवतात आणि खरे तेच सांगतात. त्या आमच्याशी खूप गप्पागोष्टी करतात. त्या रिटायर होण्याची गोष्ट काढतात तेव्हा मला फार वाईट वाटते. मला असे वाटते की त्यांनी रिटायर होऊ नये. त्यांनी आम्हाला शिकवावे आणि आम्ही पास होऊन गेल्यावर दुसऱ्या मुलांनाही शिकवावे.

**सिद्धी धुमाळ**, इ. सातवी

---

## शाळा

शाळा हे शिकण्याचं घर असतं
मनामध्ये एक छोटंस प्रेम असतं

शाळेमध्ये खेळायचं वेगळंच जग असतं
शाळेशी माझी मैत्री आहे मस्त

शाळेतल्या ताई म्हणजे प्रेमाचा लळा
आम्हाला म्हणतात, काय गं बाळा?

शाळेच्या मायेत असतो आम्ही आनंदी
शाळेपासून लांब व्हावेसे येत नाही मनी

**सिद्धी लोणारी**
इ. चौथी

## कस्तुरी ताई

आहेत कस्तुरी ताई डेंजर
ऐकला त्यांचा खवळा
की फुटतो मुलांच्या मस्तीचा भोपळा

त्या आहेत कडक
म्हणून मुले होतात सरळ
ताई येतात बाहेर तेव्हा
ग्राउंड होते क्लिअर

ताईंपाशी असते गर्दी
मला हा असे म्हणाला
मला तो तसे म्हणाला
अशी तक्रारींची सरबत्ती

**राजवीर कदम**, इ. चौथी

---

## अभ्यास

अभ्यास अभ्यास,
तू किती छान
कधी हसवतो
तर कधी रडवतो
तरी तू आम्हाला
खूप खूप आवडतो

अभ्यास अभ्यास
तू किती छान
तुला नाही केल्यावर
ताईंचा चढतो पारा
तूच आहे आम्हाला
पुढे नेणारा वारा
अभ्यास अभ्यास
तू किती छान

**श्लोक यादव**, इ. तिसरी

## शाळा

शाळा ग शाळा
तुझा खूप लागलाय आम्हाला लळा
शाळेतील शिक्षक आहेत गोड
बिंगो आणि कॉफीची सर्वांनाच ओढ
ग्रंथालयात आहेत वेगवेगळी पुस्तके
विद्याताईंच्या वाचनामुळे समजायला जाते खूप सोपे
योगासनांमुळे आमचे शरीर झाले आहे फिट
मनिषाताई आमच्याकडून व्यायाम करून घेतात नीट
स्काऊट गाईड असो किंवा मैदानी खेळ
नीताताई देतात आम्हाला खूप सारा वेळ
शाळा ग शाळा
तुझा खूप लागलाय आम्हाला लळा

**परिणीती कदम**
इ. पाचवी



## आमची शाळा

आमची शाळा आमची शाळा
येथे भरतो मुलांचा मळा
आमची शाळा आहे छान
आम्हाला येत नाही घरचं ध्यान
आमच्या शाळेत आहे एक ग्रंथालय
तेथे आम्ही पुस्तके वाचतो लय
आमची शाळा माकडांनाही आवडते खूप
ती शाळेत येतात करत हूप हूप
आमची शाळा आहे खूप मोठी
तिच्यासमोर आम्ही मुलं दिसतो छोटी
शाळेतील झाडंही आहेत आमचे मित्र
आम्ही काढतो त्यांची चित्रं
आमची शाळा लाडकी शाळा
येथे भरतो मुलांचा मळा

**प्रज्वल अहिवळे,** इ. सातवी

## शाळा

माझ्या मनाजोगी माझी शाळा
मला लागला शाळेचा लळा
शाळेत वेळ कसा जातो कळत नाही
सुट्टीत शाळेची आठवण आल्याशिवाय राहत नाही
पुस्तके आणि माझी झाली आहे मैत्री
रोज शाळेत येईन याची तुम्हाला देतो खात्री
गणिताच्या ताई आहेत कडक
म्हणून मी सारी गणिते सोडवतो बेधडक
शाळा आहे माझ्यासाठी खास
अभ्यासाला बसल्यावर मला होतो तिचा भास
शाळेचे मैदान आहे मोठे
तिच्यासारखी शाळा नाहीच कुठे

**अर्णव लाळगे, राजवीर कदम,** इ. चौथी

## परीक्षा

आली परीक्षा! आली परीक्षा!
मुलांना वाटे ती मोठी शिक्षा
लवकर संपावी ही परीक्षा
हीच असते त्यांची अपेक्षा

परीक्षेतले प्रश्नच ढीगभर
मुलांना वाटते असावेत मूठभर
विचार करत बसतात मणभर
आणि लिहितात उत्तर कणभर

टॉपर सर्व अभ्यास करतात
पटपट सगळा पेपर लिहितात
बाकीच्यांना पेपरच समजेना
हा प्रश्न कुठला हेच उमजेना

पेपर लिहायचा येतोय कंटाळा
मन म्हणते पेपर सोडून पळा
परीक्षेतले प्रश्न पंधरा–सोळा
झालाय डोक्यात सगळा घोटाळा

आता संपली परीक्षा, संपली परीक्षा
पूर्ण झाली मुलांची इच्छा!

**शांभवी निंबाळकर**
इ. सहावी



## म्हणींची गंमत

मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निरगुडी येथे पहिलीच्या वर्गात शिकत असतानाची ही गंमत आहे. त्यावर्षी आम्हाला शिंदे मॅडम वर्गशिक्षिका होत्या. मला शाळेत जाऊन दोन–तीन महिने झाले असतील. आम्ही नुकतेच लिहायला–वाचायला शिकलो होतो आणि अशातच मॅडमने एक दिवस आम्हाला मराठी म्हणी लिहायला सांगितल्या. त्यांनी उदाहरण म्हणून ‘कामापुरता मामा’ ही म्हण सांगितली. मला तेव्हा म्हणी म्हणजे काय हे समजत नव्हते. त्यामुळे मी

१.कामापुरता काका

२.कामापुरती काकी

३.कामापुरती आजी

४.कामापुरते आजोबा

असे पंचवीस नातेवाईक शोधून मॅडमने सांगितल्याप्रमाणे पंचवीस म्हणी पूर्ण केल्या आणि मॅडमला जाऊन दाखवल्या. वर्गात एकच हशा पिकला. नंतर मॅडमनी मला समजावून सांगितले की म्हणी कशाला म्हणतात.

पण आजही जेव्हा हा प्रसंग आठवतो तेव्हा मी पोट धरून हसते.

**सई सस्ते**
इ. नववी



## नई पाठशाला

मेरे गाँव का नाम कुरवली खुर्द है। मैं खेत मे रहती हूँ। माँ घर का काम करती है और खेत में भी जाती है। मेरा गाँव सुख–शांति से भरा है। मेरे घर के पास बहुत पेड़ हैं। मैंने भी एक पेड़ लगाया है। वह मेरा पहला मित्र है।

मैं तीसरी कक्षा तक गाँव में ही पढ़ी। चौथी में मैंने पाठशाला बदली। मेरी नई पाठशाला का पहला दिन था। सोमवार था। मैं पाठशाला आई। पहले मैं चौथी के वर्गशिक्षक से मिली। उनका नाम था सुवर्णा ताई। मुझे पहले बहुत डर लगा। फिर मुलाकात हुई प्रिया ताई, जगदाळे सर और प्रदीप सर से। मैंने पूरी पाठशाला देखी। पाठशाला में बहुत पेड–पौधे थे। एक बडा ग्रंथालय था। उसमें सभी तरह की किताबें थी।

धीरे धीरे मुझे किताबें पढ़ना बहुत अच्छा लगने लगा। फिर मेरे दोस्त भी बने और मेरा मन पाठशाला में लगने लगा। फिर हर्षदा ताई से मिली। उनसे दोस्त की तरह बात करने लगी। प्रिया ताई और सुवर्णा ताई भी मेरी दोस्त बन गईं। नई पाठशाला बहुत ही बढ़िया है। लेकिन मैं अपने पुराने दोस्तों को नहीं भूली हूँ।

**समृद्धी गाढवे**
कक्षा पाँचवी

# दोस्तीच्या कविता

## मित्र




तुम्हाला आहे का माहीत,
मित्र कोणाला म्हणतात?
मित्र कधी संकटात जात नाही सोडू
त्याच्यावरचा विश्वास देत नाही मोडू
मित्र म्हणजे ज्याच्याकडे बोलू शकतो सगळे
आपले मन ज्याच्याकडे करू शकतो मोकळे
मित्र तो असतो जो घेतो आपल्याला सांभाळू
आपला आत्मविश्वास कधीच देत नाही ढळू

**संहिता भुजबळ**, इ. पाचवी

## मैत्रीण

चुकल्यावर चुका दाखवणारी तूच
सुख–दु:खात साथ देणारी तूच
विचार असतात सारखे तुझे नि माझे
तुला पाहिल्यावर मन होते ताजे
तुझ्याबरोबरचा प्रत्येक क्षण आहे अनमोल
माझ्या आयुष्यात तुझा आहे महत्त्वाचा रोल
जन्मतः खूप नाती सहज मिळून जातात
पण मैत्रीची नाती मात्र तयार करावी लागतात
माझ्या जीवनातली सर्वात सुंदर भेट तू
आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर भेट तू
न बोलताच माझ्या भावना कळतात तुला
तू आणि मी जसा फुलांचा मळा

**इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी**

## दोस्ती

दोस्ती फूलों की तरह खिलती है
दोस्ती काँटों पर भी चलती है
दोस्ती पंछी की तरह उडना जानती है
दोस्ती दुख मे सुख दे जाती है
दोस्ती खुशियों की छडी बन जाती है
दोस्ती यादों की डायरी बन जाती है
तुम भूल ना पाओ इस दोस्ती को
ये दोस्ती इतनी खास बन जाती है
पढ़ते पढ़ते बूढ़े हो जाओगे
दोस्ती इतनी बड़ी किताब बन जाती है
शायद ही निभा पाओ ये दोस्ती
नहीं तो सुबह की रात हो जाती है

**राजेश्वरी भिरंगी**, इ. सहावी



# चौकट

कधी आपण आपल्या चौकटीबाहेर विचार करतो का? आपली चौकट म्हणजे सकाळी उठायचे, शाळेत जायचे, अभ्यास करायचा, जेवायचे, खेळायचे आणि झोपायचे. बस इतकेच. हे सोडून बाहेरच्या जगात कधी डोकावून पाहिले तर जाणवेल की आपण किती सुखाने राहतो आणि काहींचे आयुष्य किती दु:खाने, त्रासाने ग्रासलेले आणि खडतर असते.

मला स्वतःला हे सातवीनंतरच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत उमगले. एके दिवशी आम्ही कारने मुंबईला निघालो होतो. वाटेत मी एका मुलाला पेन विकताना पाहिले. त्याने फाटके कपडे घातले होते. मला त्याची दया आली. पेन विकून झाल्यावर तो एका पुलाखाली गेला. तिथे तो राहत असणार. मी त्याच्याकडे कारच्या खिडकीतून बघत होते. तेव्हा मला जाणवले की या जगात असंख्य लोक गरिबीशी झुंज देत आहेत.

आताच जानेवारी महिन्यात अयोध्येत राममूर्तीची प्रतिष्ठापना झाली. शासनाने त्यावर कोट्यावधी रुपये खर्च केले. पण संपूर्ण भारताच्या दृष्टीने सखोल विचार केला तर जाणवेल की सरकारने या पैशांतून गरीब लोकांसाठी अधिक धोरणे आखून त्यांची अंमलबजावणी केली असती तर?

आपल्या या सुखवस्तू चौकटीतून बाहेर पडण्यासाठी आपल्याला आजूबाजूला जे दिसते ते बारकाईने पाहणे आणि त्यावर विचार करणे खूप महत्त्वाचे आहे. अनेकांना काय चालले आहे हे माहीत असते, दिसत असते मात्र परिस्थितीवर लक्षपूर्वक आणि काळजीपूर्वक विचार कुणी करत नाही. मला वाटते की प्रत्येकजण आपल्या पातळीवर परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न करू शकेल. मी ठरवले आहे की मला जे दिसते ते मी माझ्या लेखनातून मांडणार. कारण सुखाने राहण्याचा जगातील सर्वांनाच हक्क आहे.

**सोनल गायकवाड**

इ. आठवी



# देवदेव

सन २०२१. देशभर कोरोना पसरला होता. सगळ्या गावांमध्ये लॉकडाऊन झालं होलं. मी माझ्या कुटुंबासोबत गावी होते. मला मटण खूप आवडतं आणि गावाला असल्यामुळे तर आठवड्याला मटण आणि कधी कधी अंडी. अभ्यास करायचे पण मजा येत नव्हती. सगळे मित्र–मैत्रिणी असले की मजा येत होती. धमाल करायचो.

आमच्या सहा आजोबांच्या घरी मिळून एक देवाचा कार्यक्रम ठेवला होता. तो वार रविवार. सकाळी आजीनं काहीतरी ओलं ओलं अंगावर टाकलं. मी अजून अंथरुणातच होते. मी दचकून उठले. आजीला विचारलं ''काय टाकलं अंगावर? मला झोपू दे ना!'' ती म्हणाली, ''आज देवदेव हाय, हे गोमूत्र टाकायचं असतंय.'' मी उडालेच! खूप घाण वाटली. पटकन अंघोळ केली.

देव–देव चालू झाला. माझी दुसरी आजी वेड्यासारखी नाचत होती. मी विचारलं, ''काय झालं हिला? दवाखान्यात घेऊन जावा ना.'' माझी दीदी हसली ती म्हणाली, ''अगं काही नाही झालं. अंगात देवी आलीये तिच्या. म्हणजे तिला प्रश्न विचारले की ती उत्तर सांगते.'' मला काही तरी गंमतच वाटली. मी म्हणाले, ''मी एक विचारू?'' ती म्हणाली, ''काय विचारणार आहेस तू? विचार.'' मी म्हणाले, ''कोरोना कधी जाणार?'' ती हसली आणि सगळ्यांना सांगत सुटली.

देवी आली, गेली, पण उत्तर काही मिळालं नाही.

**श्रेया यादव**, इ. आठवी



# बालपण

माझं बालपण एखाद्या सुंदर राजकन्येसारखं गेलं. बालपणी आपण सर्वांचे लाडके असतो. तेव्हा आपल्याला फार काही समजत नसतं. पण आपण काहीही बोललो, काहीतरी तोडलं–फोडलं तरी आपल्याला कोणीही काहीच बोलत नाही. जे मागू ते मिळतं. माझी आई ध्यानानं बघायची की माझं बाळ झोपलं का? जेवलं का? त्याला काही पाहिजे तर नाही ना? असं सगळं ती सारखं विचारत राहायची. तेव्हा असं वाटायचं की तिनं सारखं विचारू नये. पण आता असं वाटतं की माझी आई कधी मला विचारेल की तू जेवलीस का? तुला काही दुखतंय का? पण आता तर तिला तेवढा वेळच नसतो.

मला माझ्या लहानपणी नेहमी असं वाटायचं की केव्हा मी मोठ्या वर्गात जाईन. कारण तेव्हा वाटायचं की मोठं झाल्यावर सगळं काही सोपं असतं. पण आता जशी मोठी होतेय तसं वाटतंय की किती भारी झालं असतं जर मी छोटीच असते तर! ना कोणाची आपल्या मागे कटकट असती, ना कोण आपल्याला ओरडलं असतं. आणि लहानपणी सगळ्यांना आपल्यासाठी किती सगळा वेळ असतो– आपल्याशी बोलायला, आपलं सगळं बघायला. मोठं होऊन काय फायदा नाही. आपल्या मागे तो अभ्यासाचा भार पडतो. आणि सगळ्यांचीच कामं ऐका... आपल्याकडून कोणती चूक होऊ देऊ नका... काही नाही, एकदम बेकार असतं मोठं होणं! त्यामुळे असं वाटतं की जोपर्यंत बालपण जगता येतंय ना तोपर्यंत ते नीट जगा. कारण मोठं झाल्यावर परत नाही ते सगळं मिळत, जे बालपणात मिळतं.

**नयन मोरे**, इ. सातवी

# ग्रंथमहोत्सवाचा अनुभव

प्रार्थनेची वेळ झाली होती. त्या दिवशी शाळेत जायला मला जरा उशीरच झाला होता. पसायदान झालं आणि मी प्रार्थना हॉलमध्ये पाऊल टाकलं. म्हटलं चला, आता प्रार्थना म्हणूया. मग पुढचे अभ्यासाचे तास करायला जरा उत्साह येईल आणि मनाला शांत वाटेल. पण कुठे शांती नशीबाला? घेतली की एक रडकी आणि कंटाळवाणी प्रार्थना. पोरांनी झोपत झोपत म्हटली. बातम्या पण झाल्या. मग संज्योत ताई आणि विद्यादेवी ताई उठल्या आणि त्यांनी सांगितलं की एक वक्तृत्व स्पर्धा आहे, ज्यामध्ये 'मला आवडलेलं पुस्तक' या विषयावर बोलायचं आहे. मग मी जरा नीट लक्ष देऊन ऐकायला सुरुवात केली. संज्योत ताई म्हणाल्या की इच्छा असणाऱ्यांनी माझ्याकडे या आणि मला प्रेझेंटेशन करून दाखवा. मग आम्ही प्रत्येक वर्गातून एक एक मूल निवडू.

मी पण गेले की मग धावत. तोपर्यंत दहा–बारा मुलांचं प्रेझेंटेशन झालं होतं. म्हटलं आता आपलं काय होईल कोणाला ठाऊक? तिथूनच माघार घेतली आणि वर्गात गेले. गणिताचा तास सुरू होता. दोन गणितं सोडवून झाली. तोपर्यंत सातवीतली एक पोरगी बोलवायला आली की संज्योत ताईंनी आदीबा दिदीला बोलावलं आहे. मग घाबरत घाबरत गेले आणि तसंच घाबरत ताईंना नको म्हणून सांगणारच तोपर्यंत ताई म्हणाल्या धर हे 'द ब्रेड विनर' पुस्तक आणि पाच मिनिटांत भाषण लिहून म्हणून दाखव. पुस्तक घेतलं आणि लिहायला बसले. घाबरत घाबरत दोन पानं लिहून झाली. ताईंना दाखवलं. ताई म्हणाल्या 'खूप छान!' आणि संध्याकाळी हातात संमती पत्र देऊन म्हणाल्या की उद्या सकाळी नऊ वाजता साताऱ्याला पोहोचायचं आहे. माझा आनंद गगनात मावेना.

पाचवीतून मुकुंद, सहावीतून नंदिनी, सातवीतून प्रज्ञा, आठवीतून मी, नववीतून झील दीदी आणि दहावीतून गणेश दादा. आम्ही एवढेजण साताऱ्याला निघालो. तिथे आमची ग्रंथ



महोत्सवासाठी निवड चाचणी घेण्यात येणार होती. पूर्ण प्रवासात थंडीत कुडकुडत आम्ही भाषणाचीच तयारी करत होतो. सगळे जरा अस्वस्थच होते. अशी पहिलीच स्पर्धा होती ज्यामध्ये माझी आई माझ्यासोबत नव्हती. त्यामुळे मी तर सगळ्यांपेक्षा जास्त अस्वस्थ होते.

नऊ वाजता साताऱ्यात पोहोचलो. रजिस्ट्रेशन झालं. आमचं स्वागत करून स्पर्धेला सुरुवात झाली. सगळ्यांची भाषणं ऐकून जरा उत्साह वाढला. आम्ही सर्वांनी पण चांगल्या प्रकारे भाषण केलं. माझं भाषण तिथल्या जजला आवडलं असावं त्यामुळे त्यांनी माझ्यासोबत फोटोदेखील काढले. त्यानंतर तिथल्या ग्रंथपालांनी सांगितलं की आता दहा दिवसांनी याचा निकाल लागेल. ग्रंथ महोत्सवासाठी जी मुलं निवडली जातील त्यांच्यासाठी निमंत्रण पत्रिका येईल. मनात एक नवी आशा घेऊन आम्ही सर्वजण परतलो.

दिवस दहावा. रविवार होता. घराच्या पत्र्यावर कोणीतरी मोठा दगड टाकला असं वाटलं. सगळे बाहेर पळत गेलो. बघतो तर काय, घरासमोर बारा वानर बसलेले. मी लगेच जगदाळे सरांना फोन केला. म्हटलं, सरांकडे फॉरेस्ट ऑफिसरचा नंबर असेल. नवीन फोन घेतल्यामुळे सरांकडे नंबर नव्हता पण फोन ठेवता ठेवता ते आईला म्हणाले, आदीबाला अभिनंदन सांगा. तिची निवड ग्रंथ महोत्सवासाठी झाली आहे. तो दिवस माझ्यासाठी सोऽऽऽऽ ब्यूटिफुल होता!

गणेश दादा आणि मी साताऱ्यात ग्रंथ महोत्सवासाठी गेलो. तिथे आम्ही परत एकदा बुक टॉक केलं. आम्हाला तिथं 'येथे घडतात वाचन वक्ते' या कार्यक्रमामध्ये प्रशस्तिपत्र आणि पुस्तकं देऊन गौरवण्यात आलं. तिथं एवढं मोठं पुस्तक प्रदर्शन भरलं होतं की आम्ही ते बघून स्वतःला थांबवूच शकलो नाही. आम्ही शाळेसाठी भरपूर पुस्तकं घेतली. असेच दिवस उलटले!

एके दिवशी मी शाळेत असताना आईला कराडवरून फोन आला. ते म्हणाले तुमची मुलगी आदीबा तांबोळी खूप छान बोलते, त्यामुळे तिची कराडला ग्रंथ महोत्सवासाठी निवड झाली आहे. मग तर काय सांगू, मला आकाश ठेंगणं झाल्यासारखं वाटू लागलं. कराडला जाण्यासाठी सर्व शिक्षकांनी आणि आईनं प्रोत्साहन दिल्यामुळे माझा उत्साह वाढला. 'शौझिया' या पुस्तकावर बुक टॉक करून माझा कराड येथे द्वितीय क्रमांक आला. त्याबद्दल मला शाळेतदेखील संज्योतताईंच्या हस्ते बक्षीस देऊन गौरवण्यात आलं.

मला आठवलं की एक क्षण असा होता जेव्हा मी फक्त भीतीपोटी माघार घेतली होती. माझ्याच भाषणातलं एक उत्कृष्ट वाक्य सांगून थांबते– 'एका मिनिटात तर आपलं आयुष्य बदलू शकत नाही, पण एक पुस्तक वाचून घेतलेला निर्णय आपलं आयुष्य नक्कीच बदलू शकेल.'

**आदीबा तांबोळी**

इ. आठवी

## कावळा

आम्ही सगळी मुले डब्याच्या सुट्टीत डबा खात होतो. तेव्हा अचानक एक वानर आला. त्याला पळवून लावण्यासाठी विशाल सरांनी एक फटाका वाजवला. मग वानर इकडे तिकडे झाडावर उड्या मारू लागला. त्यामुळे झाडाच्या वाळलेल्या काटक्या खाली पडू लागल्या. त्या काटक्या मुलांच्या डोक्यात पडण्याची शक्यता होती. हे पाहून जगदाळे सर म्हणाले, ''विशाल सर, फटाके नका वाजवू.''

आता वानर एका कावळ्याच्या घरट्यापाशी बसला होता. तेव्हा चार–पाच कावळ्यांनी त्याला चोच मारायला सुरुवात केली. कारण घरट्यात अंडी होती. मग वानराने हाताने एका कावळ्याला जोरात मारले. त्या कावळ्याला तोल सांभाळता आला नाही. तोच त्याच्या पंखात घरट्याजवळची फांदी घुसली.

अंदाजे चार–पाच महिन्यांनंतर मी ग्राउंडला थांबलो होतो. मला न्यायला यायला बाबांना उशीर झाला होता. मला अचानक त्या कावळ्याची आठवण आली. मी बघितले तर तो कावळा अजून तिथेच होता. निरीक्षणातून मला असे कळले की तो अजून जिवंत आहे. तो हलत होता. त्याला खायला व प्यायला पाणी दुसरा कावळा पुरवत होता. मला खूपच आश्चर्य वाटले. तेवढ्यात मला न्यायला बाबा आले. मग मी घरी आलो.



थोड्या दिवसानंतर तो कावळा खाली पडला. त्याच्या पंखात जी काठी घुसली होती ती तुटलेली होती. त्यामुळे तो खाली पडला. त्याला खूप लागले होते. त्याला सातवीच्या मुलांनी खायला दिले, पण त्याने काही खाल्ले पिले नाही. तो वाचू शकला नाही. नंतर त्याला ग्रंथालयाजवळ पुरले. मला खूप खूप वाईट वाटले.

**श्रीराज राऊत,** इ. पाचवी

## दु:खाची जाणीव

अश्रू आहेत डोळ्यांमध्ये
आठवणी आहेत मनामध्ये
दु:ख काही कमी होत नाही
जगणं काही सोपं वाटत नाही

दु:ख असतं फक्त मनात खोलवर आत
मग डोळ्यांतून अश्रू का पडतात?
मनाची ही ठेच कमी होतच नाही
जगणं काही सोपं वाटत नाही

वस्तू गमावता लहानपणी
रडत रडत घरभर फिरली
पण माणूस गमावला जिवाचा
तेव्हा किंमत आयुष्याची कळली

कधी न कळालं दु:ख जिला
आज ती मुलगी दु:खात मिसळली
हसऱ्या त्या डोळ्यांना पाण्याची धार सुरू झाली
एका आनंदी मुलीला दु:खाची जाणीव झाली.

**राजेश्वरी भिरंगी,** इ. सहावी

## गणित

गणित सोडवणे अवघड
वाटते अनेकांना
काय असते अवघड त्यात
हेच मला समजेना.

बेरीज–वजाबाकी आपण असतो
लहानपणापासून शिकत
हिशोब कसा नाही चुकत
कधी घेताना काही विकत?

sin, cos, tan आणि x,y, π
कित्येकांसाठी डोकेदुखी असते
परंतु फक्त एवढेच म्हणजे
गणित नसते

बरेचजण राहतात एखाद्या
गणितावर अडून
आणि मग घेतात विनाकारण
डोक्याचा भुगा पाडून

नाही जमले एखादे गणित
तर विचार करत बसू नये डीप
कारण आयुष्यातही काही गोष्टी
कराव्या लागतात स्किप!

**गणेश धायगुडे**
इ. दहावी



## गणिताची गोची

गणित म्हणजे भाजीतील कारले कडू
सोडवता सोडवता येते रडू
ऐका या कडू कांद्याची कहाणी
हसता हसता येईल डोळ्यात पाणी

एक होते गाव
गावात होते आर्यभट्ट राव
त्यांनी लावला म्हणे शून्याचा शोध
शून्यावरून घेता येतो सर्व अंकांचा बोध

याच चिन्हामुळे घडली सर्व कहाणी
शून्य पडला म्हणून माझ्या डोळ्यात आले पाणी
आर्यभट्ट यांना म्हणतात पहिले गणिततज्ज्ञ
इकडे मार्क्स वाढावेत म्हणून करावे लागतात यज्ञ

पुढे आले रामानुजन मास्तर
त्यांची प्रमेये आहेत ब्लॉकबस्टर
बेरीज वजाबाकी गुणाकार भागाकार आहेत माझे मित्र
पण अपूर्णांक सोडवताना बदलते माझे चित्र

प्रमेये, समीकरणे, आर्यभट्टांचा झीरो
हे सर्व आले लक्षात तर बनाल गणिताचे हीरो
वाढवाल जर तुम्ही गणितातील रुची,
तर नाही होणार तुमची माझ्यासारखी गोची

**मृणाल घनवट**
इ. आठवी

# पिलट्याची धूम

मी आठवीमध्ये होतो तेव्हा मामाच्या गावाला उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपवायला गेलतो. मी आणि मामाची मुलं म्हणजे हर्षू आणि बारक्या उर्फ पिलट्या, रात्री दोन–तीन वाजेपर्यंत जागायचो. आमच्या बिनकामाच्या गप्पा चालू असायच्या. रात्रभर चरायचो.

मग एका शुक्रवारी असा विषय निघला की उद्या शनिवार आहे त्यामुळे मारुतीला जायचं. मी आजोबांना विचारून दोनशे रुपये घेतले. मग मामा पण आमची धूम घेऊन आला. धूम म्हणजे स्प्लेंडर गाडी. रात्री बारा वाजता आम्ही रुमाल–पाणी खेळायला लागलो. खेळ आमचा चांगला दोन तास रंगला. गोठ्यातली लाईट गेली आणि आमचा खेळ मोडला. मग आम्ही गुरांच्या दावणीतच झोपलो. झोपलो ते झोपलोच.

पहाटे पहाटे आजी दावणीत पाणी भरायला आली. अंधार असल्यामुळे तिनं दावणीत आम्हाला बघितलंच नाही आणि पाण्याची पाईप टाकली. मग ते पाणी कानापाशी आल्यावर आम्हाला जाग आली. मग आम्ही तिघांनी दावणपण धुतली आणि दावणीत आंघोळपण केली. सगळं उरकून गाडीवर बसलो आणि किक मारणार तेवढ्यात आजी म्हणली, ''हुदडत बसू नका. लवकर माघारी या. आज मंदिर बंद होणार हाय लवकर...'' तिचं वाक्य संपायच्या आत आम्ही खूप लांब गेलो होतो.



बघता बघता आम्ही गावची वेस ओलांडून पेट्रोल पंपाला मागं टाकलं. जाताना लय चढ होता. गाडी कुथत होती. एकदाचा चढ संपला आणि उतार चालू झाला. मग आम्ही पेट्रोल वाचवायचं म्हणून गाडी बंद करून सुसाट सोडली. जसा उतार संपला आणि सपाट रस्ता लागला तसा मी गाडीला किका मारायला लागलो, पण गाडी काय चालू होता होईना. मग काय करायचं म्हणून आम्ही पेट्रोलचा काटा चेक केला. मला काय कळंना कारण काट्याचं म्होरचं त्वांडच गायब हुतं. मामाचा बारका लय चाप्टर हुता. तो म्हणला, ''आरं येड्यान्नू, नीट बघा की दिसत न्हाय व्हय, तुटलेली बाजू कंची आणि चांगली कंची?'' मग त्यानं आम्हाला मार्गदर्शन केलं आणि सांगितलं की पेट्रोल संपलं आहे.

आता करायचं काय? मग वली का सुकी करायची ठरली. कडंला घराचं काम चाललेलं तिथं जाऊन बारक्यानं एक सपाट दगड आणला. लय मतभेदानंतर असं ठरलं की सुकी पडली तर माघारी जाऊन पेट्रोल पंपावर जाऊन पेट्रोल भरायचं, आणि वली आली तर दोन किलोमीटरवर

असलेल्या मंदिराकडं जाऊन मामाला फोन करायचा. आता सगळ्यात मोठा मी म्हणून दगड मी उडवणार असं मी म्हणालो. तर पिलट्या एखादा कुत्रा त्याच्यासमोरचं जेवण दुसरं कुत्र खायला येतं तेव्हा कसा फिस्कारतो तसा माझ्यावर फिस्कारला आणि म्हणाला, ''परतिक येळी तुलाच का? आता मी उडवणार, कारण मी सगळ्यात बारका हाय.'' मग हर्षूचंबी तोंड उघाडलं. म्हणला, ''परतिक येळेस मोठा आन बारकाच का? दोन नंबरला कोणच इचारत न्हाय!'' मग मी आणि बारक्यानं ठरवलं की द्यावा त्याला एवढ्या वेळेस चान्स. पण त्यानं असा काय दगड उडवला की तो कडंच्या काम चालू असलेल्या बंगल्यावर गेला. मग आम्ही त्याला खाली वाकवून लाल बत्ती केली.

नंतर माडीवर चढून बघतो तर सुकी आली होती. मग मी हर्षूला म्हणलं, ''बघ आता मी सांगतो तसं कर. एवढे दोन किलोमीटर पिलट्या गाडी ढकलंल. मग पुढं दोन किलोमीटर तू, परतून पिलट्या आणि मग परतून तू.''

पिल्या म्हणला, ''असं का?''

''कारण मी पावणा आहे,'' त्यानं काहीतरी बोलायच्या आतच मी म्हणलो.

हर्षू तयार झाला पण हे बारकं बेणं लईच हुशार होतं. त्ये हर्षूला म्हणलं, ''आरं भैया, मला यक सांग, रात्री आजी दाजीला जेवान वाढता वाढता मणली की 'लाजू नको' तवा दाजी काय म्हनला?''

''काय रं म्हनला?'' कमजोर डोक्यावर जोर देत हर्षू बोलला.

''लगीच इसरतंय! कसलं हाय कुनास ठाऊक! आरं, दाजी म्हनला की मी काय पावणा बिवणा हाय व्हय लाजायला? मंजी याचा अर्थ असा की जेवायला पावणा न्हाय आणि काम करायला पावणा हाय!''

मग या वादावादीत शेवटी ठरलं की प्रत्येकानं दीड–दीड किलोमीटर गाडी ढकलायची आणि राहिलेलं नंतर बघू. पण मी परत हर्षूला म्हणालो की तू दोन किलोमीटर ढकल, पिलट्या दोन किलोमीटर ढकलंल आणि राहिलेले चार किलोमीटर मी ढकलतो. ही दोघं शानी लगीच हो म्हणाली, जनू कसं रेड्यावानी!

पिल्यानं दोन किलोमीटर ढकललं न मग हर्षूची बारी आली. मग त्यो हिकडचं तिकडचं रान हानत मला सांगायला लागला, ''गणपती इसर्जनाला आमच्या हितं लय यगळे यगळे खेळ हुतात.'' पिलट्याला राहावलं नाही आणि तो मला म्हणला, ''दाजी, बिल्ली काय पण म्हणतीया. फेकाडी बिल्ली!'' हर्षूला बिल्ली म्हणल्यावर लय राग यायचा. तो चिडून म्हणाला, ''मी आता गाडीच ढकलणार नाही. काय करायचं ते करा.'' मग मी कसंबसं त्याला शांत करून गाडी ढकलायला लावली. त्याचं पण दोन किलोमीटर झालं. आता पाळी माझ्यावर हुती. मी म्हणालो, ''आरं पोरांनो, बसा गाडीवर.'' पण ती ऐकणाऱ्यातली नव्हती. वाकड्यात शिरायला लागली. मी म्हणलो, ''आरं लेकांनो ऐका की. पटक्यान बसा!'' ती परत आडवं घालायला लागली. मग मी गाडीवर बसलो आणि येणाऱ्या टमटमला धरलं. मग गाडी लागली की पळायला. मग ही यडी मागं पळत आली. चांगला अर्धा किलोमीटर पळवलं त्यांना.

मी टमटम सोडून गाडी उभी केली आणि मग दोघं चिडीचिप येऊन गाडीवर बसली. मी गाडी ढकलायला लागलो. अर्ध्याच किलोमीटरनंतर मोठा उतार लागला. मग मीपण गाडीवर बसलो आणि ढाळानं जोरात निघालो. म्हंजी तसं सांगायला गेलं तर मी एकच किलोमीटर गाडी ढकलली.

आम्हाला सारखी चरायची सवय असल्यामुळं कडकडून भूक लागली होती. शेवटी आम्ही पेट्रोल पंपापाशी पोहोचलो. टाकी उघडून बघतो तर काय! गच्च भरलेली. खालचा पेट्रोलचा कॉक बंद होता. मग काय झालं, कसं झालं याचा आम्ही सखोल अभ्यास केला आणि पीएचडी मिळवली. दोषी ठरला पिलट्या. कारण की पिलट्यानं रात्री मामाला कॉक बंद करताना बघितलेलं पण सकाळी त्यांनं आम्हाला काय सांगितलं नाही. काही न बोलता मी कॉक चालू केला आणि आम्ही एकशे ऐंशीच्या स्पीडनं मंदिरापाशी आलो. पण मंदिर बंद होतं.

मग घरी परत जाताना आम्ही पुरीभाजी खाल्ली आणि कोल्ड्रिंक पिलं. तो प्रत्येक घास घशाखाली जाताना मला जाणवत होतं कारण पहिल्यांदाच मी एवढ्या उशीरपर्यंत उपाशी राहिलो होतो. मग घरी गेल्यावर हा सगळा किस्सा मामाला सांगितला. मामा मला म्हणाला, ''तुझं जाऊ दे रं, पण ह्या टरमाळ्यांना समजायला नको व्हय? त्यांनी लय वेळा बघितलंय की मी रोज रात्री गाडीचा पेट्रोलचा कॉक बंद करतो म्हनून.'' मग सगळी आपल्या रोजच्या कामाला लागली.

**अभिनव काळे**

इ. दहावी

---

# Math: My Greatest - Teacher of All Time!

Math for many is a nightmare and for others it is an easy, simple thing. But for me it is the meaning of life.

I have liked math since my childhood. It mainly has two reasons. First, there is no memorizing in math. That's why I don't feel any stress while solving math problems. Second, in math it is not important for you to have a good handwriting.

While solving a math problem the first step is to think. After that we have to write all the steps and find the answer. It is very important that we work towards our goal in a proper sequence. We should have a plan for our goal.

Second characteristic of math is the importance of 'perfection' in it. While solving a math problem, a single mistake can make entire solution go wrong.

One more characteristic of math is that we can double check our answer by putting the value of our answer into the original problem. While writing an answer, the correct and incorrect steps keep on arguing in my mind and then I have to choose. It is like taking a decision in life.

Math is sustainable. Every step of it has a proof. It gives us a perspective towards life. It brings perfection to our work. Math gives meaning to the life!

**Ganesh Dhaigude,** Grade 10

# Rainy Poems
(Grade 8)

## When
When I see the rain coming
I will go in the garden
When I see the rain coming
I will go near a waterfall
When I see the rain coming
I will go to the river
When I see the rain coming
I will go for a trek
When I see the rain coming
I will make tea
When will I see the rain coming?

**Akshara Mulik**

## Drenched
Today rain is coming
My house is drenched
I am making some coffee
Hot and delicious.

Today rain is coming
My yard is drenched
I see little grass growing
Wet and green.

**Chinmay Shinde**

## It is Raining
It is raining
Roads are muddy
People stay home
Drinking tea
Sitting in the window
Enjoying the rain
Children get wet
Playing rainy cricket

**Rajveer Nimbalkar**

## Rain, Oh Rain
I am very sad because rain is here
I don't like it because it is a killer

Many people go to see the waterfall
But they don't know it is death's call

For school the children are late
They walk slow as the soil is wet

Rain, oh rain, from here don't pass
Please don't spoil our sports class

**Yash Nale**

## The Song of the Raindrops
When I sing a song
Suddenly comes the rain
I stop singing and
Go to the window

Now I am humming
The song of the raindrops
Trees have a new life
Feels like a dream

**Khushal Wala**

## Rainy Day
I just love the rain
The sweet smell of the clay
I love this vibe
I skip a school day

I want to play in the rain
But my mummy comes in the way
I forget everything
And sneak out to play

**Farhan Attar**

## Rain on the Farm

Black clouds come to the farm
We put the fertilizer.
Drizzling rain comes to the farm
We plant bajra happily.
Pouring rain comes to the farm
We break the farm bunds.

**Sarthak Bhise**

## What is Rain?

Rain is a gift to the world
Rain is the love of the earth
Rain is a joy to the farmers
Rain is a boon for the plants
Rain is a magic of nature
Rain is the meaning of life
Rain is happiness for children
Rain is hope for the mankind

**Gayatri Shinde**

## A Happy Boy

When monsoon is here
I am a happy boy
Then air is cool
And filled with joy

I want to get wet
Many insects I see
When monsoon is here
I want to drink hot tea

**Prathamesh Kakade**

## The Two Sides

When it drizzles
My happiness blooms
The trees sing
And flowers dance

Sometimes it pours
There are landslides
Many are dead
People are scared

**Farhin Attar**

## This Day

This day is rainy
This day is lovely
The water drops on my hair
My head feels cool

The clouds chase away the sunrays
And send raindrops to the earth
I feel like sleeping the whole day
This day I love!

**Akshara Ghorpade**

## Rain in the Lane

I was walking in the lane
When came the rain
I opened my umbrella
Under their shells hid the snails

I was walking in the lane
When came the drops
The goats took shelter
People closed their shops

**Tanmay Anbhule**

## When it Rains

When it rains
The soil smells sweet
Happily, we breathe
And get out to play

When it rains
We don't see the sun
For he is having fun
Playing hide and seek

**Pranjali Kolwadkar**

## The Library Incident

When Diwali vacation started, I had many plans- sleeping a lot and doing fun things like other kids. But something unfortunate happened. I had to go to my mom's friend's house for her elder son's funeral. My mom was there to help her get through that shock, and so was I. Her younger son Vaibhav and I had always been good friends.

Mom's friend's house was a big old mansion. Mom and I were staying on the second floor. On the way to our room there was a small library and there was a swing in it.

One night when I was passing from the library I took a peek inside. I saw an old woman sitting on the swing. She was reading something. Her hair was messy. Like she hadn't taken a shower for many days. Suddenly she looked at me and smiled in a creepy way. She was staring so hard at me that I almost screamed. Suddenly the old lady started to scream and throw stuff.

All the people in the house came running upstairs. They made her calm. I learnt that she was Vaibhav's grandma. She was acting like this because of the sudden shock.

To this day when I remember that incident, her creepy smile, and her staring into my soul, it gives me goosebumps. I haven't been there since, and I haven't heard from anyone about her. But I wish she is okay.

**Darshana Gadekar**

Grade 7





# Journey of Memories

The school life is the best life. Anyone who has been a student knows what school life is all about. It is the golden period of learning and it truly holds an impact on a student. School represents an important learning experience which gives us self-confidence, motivation and also the will to always give our best. In addition, it blesses us with friends. School days are the best days of our lives. For me, these days are like an invaluable treasure!

I still remember the day when I entered this school and I can still feel how warmly we were welcomed. I remember how we used to play in sand while waiting for our parents to arrive and say ‘Namaste’ to teachers before going home. I learned to co-operate and my personality was shaped in the company of my friends.

My time in high school was an equally valuable learning experience where I met some of my best friends. Looking back, I realize my time in high school showed me how important school life is and without it I would not have got great friends, loving teachers, good knowledge, experiences, and cheerful memories which I have today.

There were so many days filled with excitement- the annual function day on which we dressed up differently and danced our hearts out, the sport days which always held energetic atmosphere, the Independence Day, and the Republic Day when we wore ironed uniforms, the festival days when we made the clay diyas and clay idols of Ganpati. The funniest thing is how lazily we wrote the reports of our educational field visits and how we always waited for annual project to get completed, so after that we can start practicing for our annual gathering!

In the class decorating competition, we decorated our class with the memories we had captured. Looking at the photographs we were reliving those beautiful moments over and over again. The time will surely fly, but these memories will last forever…

**Ruchita Satpute**
Grade 10



# Time Travel

After every annual exam we know that we are going to meet our classmates again next year. But this time it will not be possible. Why? Because we are passing out from the school. I remember the first day of school. I was crying. Everyone was! Most children feel that school is like the most boring thing ever. But I feel the exact opposite! On our first day we were crying to get out of the school but now we are crying to stay here.

Every day we have to turn a page in the book of life. But we can never forget the previous chapters. School is like one beautiful chapter. All the memories that we have gathered from the preschool to the send-off are written with golden ink in this chapter. We can read them whenever we want. But just read… not live.

I know I would meet many teachers and friends in my upcoming life but old friends and teachers will always be special. We have come a long way- from fighting each other to fighting for each other. School life is precious and the school memories are like wishes of Nobita- Never ending! I just wish to have a friend like Doraemon with whom I could travel in time!

**Sakshi Hendre**

Grade 10

# May be Next Year?

Mostly people will say that the $9^{th}$ standard is tough. Most changes also happen in the $9^{th}$ the syllabus is vast, and exam formats are change. When you come in the $9^{th}$ standard you are suddenly grown up. You are expected to be sincere, mature and study 24/7. Everyone tells you that $9^{th}$ is the base of the $10^{th}$, so study hard. Many times you are discouraged by people. For example, my friend was told that science is very difficult in $9^{th}$ and so he didn't want to study it. It actually became very difficult for him. You are not allowed to waste time playing, drawing, dancing etc. Instead you should just study. This is what you are told- again and again. Exhausted, huh? This is just the beginning!

Well, our class is fun loving. And most of us hate to study. From the start, we never obeyed the rules. We are always having fun together and we are a little annoying to others. But still everyone in my class has some virtue. We are good at dance, arts, sports, music, farming and even acting. But because of us not being good at studies we had many complaints about us. We made a lot of trouble too. Our class will always be remembered for breaking rules.

You may call us unserious or immature. But I'm glad that we'll never regret not enjoying the childhood to the fullest. May be we'll grow up next year…

**Zeel Karne**

Grade 9

# El-coco

(El-coco is an urban legend. He is also known as 'the shape shifter'. Even today parents from all around the world scare their children when they are misbehaving, by the name of El-coco.)

Many years from now in a small town a boy named Kuro was celebrating his birthday. Kuro always had problems making friends. Today, he was going to be 10 years old. He was upset because his parents didn't gift him a dog on his birthday. He cried himself to sleep. But the very next day something happened. His parents were sad that he was upset so they bought him a new dog. But Kuro wasn't happy at all! Instead he got up from his chair and left the room. His parents were shocked. Kuro was a quiet kid from the start. But he used to love spending time with his parents. "Surely something has happened", his mom said.

Next day Kuro didn't show up for breakfast. His mom had to force him to get out of his room. "Kuro is acting differently," his mom complained to his dad. "It's probably because he is getting older," his father ended the conversation. It was true, Kuro was acting differently. But a time came when his mom couldn't take it anymore. She decided to see secretly what Kuro was doing in his room. She went upstairs and took a peek into Kuro's room. What she saw shocked her. Kuro neither was on his phone, nor was he sleeping. He was sitting on the floor talking to someone. She didn't see anyone but she could sense a presence. Kuro was talking to it as a friend. He was lost in himself without any facial expressions. His eyes were empty. And there was something creepy in them. When he noticed his mom he waved at her so creepily that she almost screamed.

She locked her son and called Kuro's father. However he didn't think it had anything to do with paranormal activities. He convinced Kuro's mom to take him to a doctor. "You'll have to come twice a week," the doctor said firmly. Kuro's mom nodded. However she was really worried for him. She had heard some rumors about El-coco. People said his target was mostly kids. So whenever in town kids complained that 'there was someone under the bed', parents didn't let the kids sleep there before performing some rituals. They also believed that when any kid was crying in his room or was just lonely, El-coco slowly took over his soul.

Three months passed by. Kuro didn't seem to recover. Situation got even worse. He wasn't ready to leave the house or his room. He used to stare at wall and laugh alone as if he was lost. Doctors said he had gone mad. Soon, Kuro stopped eating, responding and he had to be put in a mental hospital.

After a few months Kuro's mom started hearing voices from his room. She first ignored them. But deep inside she knew it was El-coco.

**Darshana Gadekar**, Grade 7






## Dreams

Dreams are not only
That you have in sleep
Success and goals
Is the biggest leap

A dream is what
You wanna do or be
If you really want it
You can do anything

Work of people will
pull you back
But coming back
is your hack

Words of people
Will make you depressed
Cause they don't know
The struggle behind success

Life is nothing
Without a dream
It's just like
A cake without cream

If you do mistakes
Make the corrections
But giving up
Is not an option!

**Khushi Doshi**
Grade 7

# मलपृष्ठाविषयी

# सलोख्याची सापशिडी

आठवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या मैदानावरील स्टेजवर सलोख्याची एक भली मोठी सापशिडी रंगवली. प्रेम, मैत्री, सन्मान इ. चौकोनांतून वर जाणाऱ्या शिड्या, आणि भेदभाव, हिंसा, युद्ध यांवरून खाली घेऊन येणारे साप ही सलोख्याची अनोखी सापशिडी खेळायला मुलांना आणि मोठ्यांनाही मजा आली. मागच्या पानावर ही सापशिडी सर्व वाचकांसाठी दिली आहे. जरूर खेळा!





सापशिडी संकल्पना व निर्मिती: अवंती निंबाळकर, फरहीन आतार, मृणाल घनवट, इ. ८ वी


सलोखा
युद्ध
द्वेष
भेदभाव
विश्वास
त्रास, दुखावणे
अन्याय
प्रेम
सन्मान
सलोख्या दिशेने सुरुवात
सत्कार्य
संवाद
Avanti.